POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-२१६ ● मुंबई, शनिवार, ८ मार्च २०२५ ● पृष्ठ-४ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## "सुरेश धस हे सुद्धा आकाच..."

### बीडच्या खोक्या भोसलेचा आणखी काही व्हिडीओने खळबळ




**सतीश भोसलेचे तीन व्हिडीओ व्हायरल**

आतापर्यंत सतीश भोसलेचे तीन व्हिडीओ व्हायरल झाले आहेत. यातील पहिल्या व्हिडीओत सतीश भोसले हा मारहाण करताना, दुसऱ्या व्हिडीओत तो गाडीत पैसे मोजताना आणि तिसऱ्या व्हिडीओत तो पैसे उधळत असल्याचे पाहायला मिळत आहे. आता या व्हिडीओवर सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

**■बीड । प्रतिनिधी :**

बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची ९ डिसेंबर २०२४ ला निर्घृण हत्या करण्यात आली. यामुळे बीडमधील कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न चव्हाट्यावर आला आहे. बीडमधील शिरुर तालुक्यातील एका व्यक्तीला मारहाण करण्यात आल्याचा व्हिडीओ व्हायरल झाला होता. भाजपचे आष्टी मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांचा सतीश ऊर्फ खोक्या भोसलेने त्याला मारहाण केल्याचे समोर आले होते.

शिरूर तालुक्यात खोक्याची मोठी दहशत असल्याचा आरोप होत आहे. आता या खोक्याचा आणखी एक प्रताप समोर आला आहे. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी सतीश भोसलेचा पैसे उधळतानाचा नवा व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओमुळे आता नवीन वादाला तोंड फुटले आहे.

**अंजली दमानियांकडून व्हिडीओ व्हायरल**

अंजली दमानिया यांनी नुकंतच त्यांच्या अधिकृत ट्वीटरवरुन एक व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओला त्यांनी ह- टके कॅप्शन दिले आहे. ल्हहे माननीय आदरणीय सन्माननीय सतीश भाऊ भोसलेह्न, असे अंजली दमानिया यांनी म्हटले आहे. या व्हिडीओत सतीश भोसले यांच्या समोर असलेल्या टेबलावर पैशांचे बंडल पाहायला मिळत आहे. यात १००, २०० आणि ५०० रुपयांचे बंडल पाहायला दिसत आहे. सतीश भोसले हा या पैशांच्या बंडल हाताने उधळताना पाहायला मिळत आहे. सध्या त्याचा हा व्हिडीओ व्हायरल होत आहे.

**तृप्ती देसाई काय म्हणाल्या?**

''सुरेश धस हे सुद्धा आता आकाच निघालेले आहेत. त्यांचेही कार्यकर्ते क्रूर कृत्य करताना दिसतात. त्यांच्यावर कारवाई झालीच पाहिजे. धनंजय मुंडेंचे वर्चस्व संपून आपलं वर्चस्व कसं वाढवता येईल, यासाठी त्यांची लढाई होती. बीड जिल्ह्यातील गुन्हेगारी कमी व्हावी, यासाठी त्यांची अजिबात लढाई नव्हती. त्यामुळे बीडमधील जे सर्व नेते आहेत, त्यांचे जर असे कार्यकर्ते किंवा टोळ्या असतील, तर जो कोणी आका असेल, त्या सर्वांवर कारवाई होणं गरजेचे आहे'', असे तृप्ती देसाई म्हणाल्या.

## 'तुमचे हात पाय तोडून टाकेन'

### खोक्या भाईची थेट विद्यार्थ्यांना धमकी

बीडमध्ये एका व्यक्तीला बॅटने मारहाण करणारा आरोपी सतीश भोसले उर्फ खोक्या याचे आणखी कारनामे उघडकीस येत आहेत. त्याचे अनेक व्हिडीओ व्हायरल होत आहेत. यामधील एका व्हिडीओत खोक्या भाई विद्यार्थ्यांना हात पाय तोडण्याची धमकी देत आहे. शिरुरमधील कार्यक्रमात खोक्या भाईने ही धमकी दिली आहे.



**बीडमधील खोक्या भाईचा आका कोण? कोण आहे हा सतीश भोसले? सुरेश धस कनेक्शन काय?**

व्हिडीओत सतीश भोसले मैदानात विद्यार्थ्यांसमोर उभा असून त्यांना हात पाय तोडण्याची धमकी देत असल्याचं दिसत आहे. यावेळी त्याच्या हातात सोन्याचा कडा दिसत असून, भाईगिरी करताना दिसत आहे. दरम्यान दुसऱ्या एका व्हिडीओत तो पैशांची उधळण करताना दिसत आहे.

वन्य प्राण्यांची शिकार केल्याचंही उघड लॅव्हिश लाईफ जगण्याबरोबरच खोक्याला हरण, ससा, मोर अशा वन्य जीवांचं मांस खाण्याचीही आवड होती. शेतात हरण पकडण्यासाठी लावलेल्या सापळ्यावरुन त्यानं दिलीप ढाकणे आणि त्यांच्या मुलाला मारहाण केली होती. त्याच्यावर दोन गुन्हे दाखल झाल्यानतंर तो फरार झाला आहे. त्याच्या शोधासाठी पोलिसांची दोन पथकं पुणे आणि अहिल्यानगर येथे रवाना झाली आहेत.

बीडमधील मारहाणीचे आणखी दोन व्हिडीओ व्हायरल झाले आहेत. दरम्यान याप्रकरणी सतीश भोसलेवर व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याचा शोध सुरु आहे. सतीश भोसले हा आमदार सुरेश धस यांचा कार्यकर्ता असल्याचा आरोप अंजली दमानियांनी केला आहे.

एका व्यक्तीला बेदम मारहाण करतानाचा शिरुरमधील धक्कादायक व्हिडिओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे. या व्हिडिओत सतीश भोसले हा एका व्यक्तीला मारहाण करताना दिसत आहे. दरम्यान या प्रकरणी सतीश भोसलेसह 4 जणांवर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

- सतीश भोसले बीडच्या शिरूर शहराजवळीस पारधी वस्तीवर राहतो
- सतीश भोसले मित्रांसोबत लॅविश लाईफ जगतो
- गेल्या काही वर्षापासून सक्रिय राजकारणात सहभाग
- भाजप आमदार सुरेश धस यांचा कट्टर समर्थक
- शिरूर कासार परिसरात सतीश भोसलेची खोक्या पार्टी नावानं दहशत

## राज्यातील जनतेला हवामान खात्याचा गंभीर इशारा

**■मुंबई । प्रतिनिधी :**

राज्यात मार्च आणि मे मध्ये कमाल आणि किमान तापमानात मोठी वाढ होणार असल्याचा इशारा भारतीय हवामानशास्त्र विभागाने दिला आहे. तर यावर्षीच्या फेब्रुवारी महिन्यात पुण्यात तापमानाचा पारा हा दहा वीस नव्हे तर तब्बल सव्वाशे वर्षातील उच्चांक असलेला उन्हाळा ठरलाय.त्यामुळे वाढत असलेला उन्हाळा ही आता चिंतेची बाब बनलीय का? असा प्रश्न उपस्थित होतोय.



राज्यासह देशभरातील उष्णतेचा पारा हा दिवसात दिवस वाढत असल्याचे पाहायला मिळते. उत्तरेकडून येणारे थंड वाऱ्यांना अडथळा निर्माण झाल्याने वातावरणात प्रतीचक्रवात स्थिती निर्माण झाल्याने यंदा राज्यात उन्हाळा जास्त जाणवतो. पुण्यात तर फेब्रुवारीमध्ये सरासरी तापमानाचा उच्चांकत सव्वाशे वर्षांचा रेकॉर्ड ब्रेक ३९ कमाल तापमानवाढीचा चटका जाणवलं होता तर सोलापूर,रत्नागिरी मध्ये ३८ कमान तापमानाचा उच्चांक नोंदविण्यात आलाय तर सांगली.. सातारा. उस्मानाबाद आणि अकोला मध्ये ३७ कमाल तापमानाची नोंद झालीय.

## पार्ले -जी कंपनीशी संबंधित अनेक ठिकाणी छापे

पार्ले-जी कंपनीशी संबंधित अनेक ठिकाणी छापे मारण्यात आले आहेत. पार्ले -जी कंपनी आयटीच्या रडारवर आहे. मुंबईमध्ये या कंपनीशी संबंधित अनेक ठिकाणी छापेमारी करण्यात आली आहे. पालेर्जी हा बिस्किटांचा मोठा ब्रॅण्ड आहे.

पार्ले-जी कपंनी आयटीच्या रडार- वर आहे. पार्ले-जी कंपनीशी संबंधित मुंबईतील अनेक ठिकाणी आयटीकडून छापेमारी करण्यात आली आहे. पार्ले-जी हा बिस्किटचा मोठा ब्रॅण्ड आहे. त्यामुळे मुंबईत पार्ले -जी कंपनीशी संबंधित असलेल्या ठिकाणावर अचानक पडलेल्या या छाप्यांमुळे खळबळ उडाली आहे. कर चोरी प्रकरणात पार्ले-जी कंपनी आयकर विभागाच्या रडारवर आ- हे. अजूनही मुंबईच्या काही ऑफीसमध्ये छापेमारी सुरूच आहे.




मुंबई आणि गुजरातच्या वेगवेगळ्या ऑफीसमध्ये छापेमारी सुरू असल्याची माहिती समोर आली आहे. पार्ले-जी कंपनीने जे काही आर्थिक व्यवहार केले आहेत, त्यामध्ये त्यांनी करचोरी केल्याचा संशय आयकर विभागाला आहे. याच पार्श्वभूमीवर आज सकाळपासून पार्ले-जी कंपनीशी संबंधित मुंबई आणि गुजरातमधील ठिकाणावर आयकर विभागानं छापे घातले आहेत. व्हिले पार्लेमध्ये मोठं कार्यालय आहे, तिथे आयकर विभागाकडून छापेमरी सुरू असल्याची माहिती समोर आली आ- हे. यासोबत मुंबईत इतर काही ठिकाणी कंपनीशी संबंधित ठिकाणांवर आयकर विभागाकडून छापेमारी करण्यात आली आहे.

**गुजरातमध्ये छापेमारी**

पार्ले-जी कपंनी आयटीच्या रडारवर आहे. पार्ले-जी कंपनीने जे काही आर्थिक व्यवहार केले आहेत, त्यामध्ये त्यांनी करचोरी केल्याचा संशय आयकर विभागाला आहे. याच पार्श्वभूमीवर ही छापेमरी सुरू आहे. आयकर विभागाकडून मुंबई सोबतच गुजरातमधील या कंपनीशी संबंधित कार्यालयांवर आयकर विभागानं छापेमारी केली आहे. या घटनेनं खळबळ उडाली आहे. त्यामुळे आता या छापेमारीतून आयकर विभागाच्या हाती काय लागणार? हे पाहाणं महत्त्वाचं ठरणार आहे. पार्रे-जी ही बिस्किट बनवणारी मोठी कंपनी आहे, बिस्किटांचा ब्रॅण्ड आहे. पालेर्जी कंपनीवर आयक विभागाकडून आज छापेमारी करण्यात आली आहे. आयकर विभागाला करचोरीचा संशय आहे.

## हॉटेल्स, उपहारगृह मालकांनी मेन्यू कार्ड मराठीत करावं

### शिवसेना ठाकरे गटाची मागणी... जिल्हाधिकाऱ्यांना पत्र

**■मुंबई । प्रतिनिधी :**

मराठीच्या मुद्यावरुन राज्यातील राजकीय वातावरण चांगलच तापल्याचं पाहायला मिळत आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे नेते भैय्याजी जोशी यांनी मराठीबाबत केलेल्या वक्तव्याच्या विरोधात शिवसेना ठाकरे गट आक्रमक झाला आहे. आता दुकानांच्या मराठी पाट्यानंतर, मुंबईतील हॉटेल्स, उपहारगृह, दुकान मालकांनी मेन्यू कार्ड देखील मराठीत करण्याचा आग्रह शिवसेना ठाकरे गटानं केला आहे. मुंबई जिल्हाधिकाऱ्यांनी मराठीत मेन्यू कार्ड आणि हॉटेल बिल करण्यासाठी सूचना द्याव्यात, अशी मागणी शिवसेना ठाकरे गटाकडून जिल्हाधिकाऱ्यांना पत्राद्वारे करण्यात आली आहे.इतर राज्यात ज्याप्रमाणे स्थानिक व्यावसायिक, दुकानदार हॉटेल मालक उपाहारगृहामध्ये भोजनसूची, मेन्यू कार्ड वर स्थानिक भाषेला प्राधान्य देतात. मात्र मुंबईत महाराष्ट्रमध्ये परिस्थिती काही प्रमाणात वेगळी असून येथे अनेक ठिकाणी मेन्यू कार्ड किंवा हॉटेल बिल देताना इंग्रजी भाषेला प्राधान्य दिले जाते. त्यामुळे मुंबईतील सर्व हॉटेल्स, उपहारगृहमधील मेन्यू कार्ड वर त्यासोबतच हॉटेल बिल वर मराठी भाषेचा वापर करावा, अशी मागणी ठाकरेंच्या शिवसेनेचे उपविभाग प्रमुख कृष्णा पवळे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना पत्र लिहून केली आहे.



**भैय्याजी जोशींच्या वक्तव्यावर काय म्हणाले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस?**

भय्याजी जोशींचं वक्तव्य मी ऐकलेलं नाही. ते मी ऐकून त्यावर मी बोलेन. मुंबईतील आणि महाराष्ट्राची भाषा मराठीच आहे. महाराष्ट्रात राहणाऱ्या प्रत्येकाने मराठी भाषा शिकली पाहिजे, त्याला समजली पाहिजे. इतर भाषांचा इथे सन्मान आहे, कुठल्याही भाषेचा आम्ही अपमान करणार नाही. जो स्वतःच्या भाषेवर प्रेम करतो तोच इतरांच्या भाषेवर प्रेम करु शकतो, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

**नेमकं काय म्हणाले होते भैय्याजी जोशी?**

मुंबईत विविध राज्य, प्रांत आणि भाषा बोलणारे नागरिक राहतात. मुंबईत अनेक भाषा आहेत आणि घाटकोपरची भाषा गुजराती आहे, त्यामुळे मुंबईत येणाऱ्या प्रत्येकाला मराठी शिकलं पाहिजे असं नाही. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखेत काम करणारा प्रत्येकजण ईश्वरी कार्य करत आहे. स्वयंसेवक नावाची ही शक्ती आहे, त्या शक्तीच्या रूपाने प्रत्येकजण काम करतो. जे स्वतःसाठी जगतात ते पशु समान असतात आणि दुसऱ्यासाठी जगतात ते खरे आयुष्य जगतात आणि त्यांनाच मनुष्य म्हणावे, असे भय्याजी जोशी यांनी म्हटले होते.

## पुण्यानंतर मुंबईत भयानक घटना

# १२ वर्षीय मुलीवर सामूहिक बलात्कार

**■कोल्हापूर । प्रतिनिधी :**

विद्येचं माहेरघर पुण्यानंतर मुंबईत अतिशय धक्कादायक घटना घडली आहे. अवघ्या १२ वर्षीय मुलीवर पाच जणांनी बलात्कार केलाय. पोलिसांनी पाचही आरोपींना अटक केली असून पुढील चौकशी सुरु करण्यात आली आहे. २४ फेब्रुवारी रोजी घरातून गायब झालेली मुलगी २७ फेब्रुवारी रोजी पालिसांना भेटली. पण तोपर्यंत फार उशिर झाला होता. मुंबईत वेगवेगळ्या ठिकाणी मुलीवर अत्याचार करण्यात आले. दादर रेल्वे स्थानक परिसरात आढलेल्या मुलीने पोलिसांना २४ ते २७ फेब्रुवारी दरम्यानचा घटनाक्रम सांगितला.



मिळालेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी मुंबईतील जोगेश्वरी येथे तिच्या नातेवाईकांसोबत राहत होती. २४ फेब्रुवारी रोजी मुलगी घरातून गायब झाली. पीडित मुलीच्या काकांनी २६ फेब्रुवारी रोजी जोगेश्वरी पोलिस ठाण्यात अपहरणाचा गुन्हा दाखल केला होता. मात्र मुलगी सापडली नाही. याच दरम्यान, मुलगी २७ फेब्रुवारी रोजी दादर रेल्वे स्थानकात एकटीच असल्याचं पोलिसांच्या लक्षात आलं. पोलिसांना संशाय आला आणि त्यांनी मुलीची चौकशी केली. तेव्हा त्या १२ वर्षांच्या मुलीने तिच्यावर झालेल्या अत्याचाराची पोलिसांना माहिती दिली. त्यानंतर दादर पोलिसांनी मुलीला जोगेश्वरी पोलिसांच्या ताब्यात दिलं.

तपासात मिळालेल्या माहितीनुसार, एका एसी मॅकेनिकने मुलीचं अपहण केलं. मुलीला एकटी पाहून आरोपींनी तिला जोगेश्वरीतील संजय नगर भागात असलेल्या त्याच्या घरी नेले. जिथे २६ फेब्रुवारीच्या रात्री तीन तरुणांनी तिच्यावर आळीपाळी बलात्कार केला. त्यानंतर २७ फेब्रुवारी रोजी मुलीने तिघांच्या तावडीतून स्वतःची सुटका केली.

जोगेश्वरी येथून स्वतःची सुटका केल्यानंतर पीडित मुलगी घाटकोपरपर्यंत पोहोचली. त्यानंतर अन्य दोन पुरुषांनी तिली मदद करतो असं सांगत मरीन ड्राईव्ह आणि त्यानंतर दादर येथे घेऊन गेले. दोघांनी देखील मुलीवर अत्याचार केले. २४ ते २७ फेब्रुवारी दरम्यान मुलीसोबत अत्यंत धक्कादायक घटना घडली आहे. पोलिसांनी याप्रकरणी पाचही आरोपींना अटक केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, घरात भांडण झाल्यामुळे मुलगी घर सोडून गेली होती. सीसीटीव्हीच्या माध्यमातून पोलीस प्रकरणाचा तपास करत आहेत. १२ वर्षीय मुलीवर झालेल्या घटनेनंतर महिलांसाठी सर्वात सुरक्षित समजल्या जाणाऱ्या मुंबई शहरातही महिलांच्या सुरक्षेवर गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.

## स्वारगेट बलात्कार प्रकरणातील पीडितेच्या 'त्या' प्रश्नाने पोलीस निरुत्तर...

**■लातूर । प्रतिनिधी :**

पुण्याच्या स्वारगेट बसस्थानकात गेल्या आठवड्यात शिवशाही बसमध्ये एका २६ वर्षांच्या तरूणीवर अत्याचार करण्यात आला. आरोपी दत्ता गाडे याने तरूणीला फसवून दुसऱ्या बसमध्ये नेलं आणि तिथे तिच्यावर एकदा नव्हे दोनदा अत्याचार केला, त्यानंतर तो फरार झाला. अनेक तासांच्या शोधमोहिमेनंतर पोलिसांनी त्याला त्याच्या गुणाट गावातून बेड्या ठोकून अटक केली. न्यायालयाने त्याला १२ मार्चपर्यंत पोलीस कोठडीही ठोठावली. दरम्यान या लैंगिक अत्याचार प्रकरणाचा तपास आता गुन्हे शाखेक- डे सोपवण्यात आला आहे. त्यानंतर गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी पीडित तरूणीशी संवाद साधला. मात्र त्यावेळी पीडितेने विचारलेल्या एका प्रश्नामुळे अधिकारीदेखील निरुत्तर झाले आहेत.

पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी स्वारगेट अत्याचार प्रकरणाचा तपास ताब्यात घेण्याचे आदेश गुन्हे शाखेला दिले होते. त्याप्रमाणे तपास गुन्हे शाखेकडे वर्ग झाल्यानंतर गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी पीडित मुलीशी संवाद साधला होता. मात्र त्यावेळी पीडित तरूणीने अधिकाऱ्यांना एकच सवाल विचारला. 'माझ्या बदनामीला जबाबदार कोण?' असा प्रश्न त्या तरूणीने अधिकाऱ्यांना विचारला, पण त्यांच्याकडे त्या प्रश्नाचं काहीच उत्तर नव्हतं. तो प्रश्न ऐकून तपास अधिकारी देखील निरुत्तर झाले.

**आरोपीचे उडवाउडवीची उत्तरं**

दरम्यान स्वारगेट एसटी आगारातील बलात्कार प्रकरणातील आरोपी दत्तात्रय गाडेची गुन्हे शाखेने लष्कर पोलीस ठाण्यात तीन तास कसून चौकशी केली. गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त निखिल पिंगळे आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक शैलेश संखे यांनी चौकशी केली. मात्र, गाडे पोलिसांना उडवाउडवीची उत्तरे देत असल्याची माहिती समोर आली आहे. गाडेचा मुक्कम सध्या लष्कर पोलीस ठाण्याच्या कोठडीमध्ये आहे. या गुन्ह्याचा तपास स्वारगेट पोलिसांकडून नुकताच गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला आहे. हा तपास खंडणीविरोधी पथकाकडे सोपविण्यात आला आहे. तपासादरम्यान दत्ता गाडे याने उडवाउडवीची उत्तरं दिली.

## सरकारी रुग्णवाहिकेसाठी फोन केला

### ६ तासांत रुग्णवाहिका आली नाही... रुग्णाने सोडले प्राण

**■उल्हासनगर । प्रतिनिधी:**

राज्यात सरकारी रुग्णवाहिकेसाठी १०८ क्रमांकावर फोन केला जातो. त्यानंतर का- ही वेळेतच रुग्णवाहिका येत असल्याचा दावा केला जातो. परंतु उल्हासनगरमध्ये वेगळाच प्रकार घडला. अत्यवस्थ असलेल्या रुग्णास नेण्यासाठी सरकारी रुग्णवाहिकेला फोन केला. परंतु एक तास झाला, दोन तास झाले तरी रुग्णवाहिका आली नाही. फोन केल्यावर सहा तास झाल्यावरही रुग्णवाहिका आली नाही. अखेर चिंताजनक प्रकृती असलेल्या त्या रुग्णाने प्राण सोडला. या प्रकरणात विधानसभेत तारांकित प्रश्न उपस्थित झाला. त्यानंतर जिल्हा शल्यचिकित्सक डॉक्टर मनोहर बनसोडे यांचे निलंबन करण्यात आले. उल्हासनगरच्या शासकीय मध्यवर्ती रुग्णालयाचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉक्टर मनोहर बनसोडे यांचे निलंबन करण्यात आले आहे. मध्यवर्ती रुग्णालयात प्रकृती चिंताजनक असलेल्या रुग्णावर योग्य उपचार झाले नाहीत आणि त्याला दुसऱ्या रुग्णालयात हलवण्यासाठी तब्बल ६ तास सरकारी रुग्णवाहिका आली नाही, याबाबत ठापका त्यांच्यावर ठेवण्यात आला. विधानसभेत अर्थसंकल्पीय अधिवेशात याबाबत तारांकित प्रश्न उपस्थित झाला. त्यानंतर डॉक्टर बनसोडे यांनी कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका ठेवत त्यांचे निलंबन करण्यात आले.



## पेटलेला नारळ अन् मानवी कवटीसोबत अघोरी प्रकार

### पेणच्या नाडे गावात रात्रीस जादूटोणा चाले

**■पेण । प्रतिनिधी :**

अंधश्रद्धाविरोधी कायदे आणि या कायद्याच्या अंमलबजावणीचे आदेश राज्य शासनानं दिलेले असतानाही महाराष्ट्रात मात्र अद्यापही या आणि अशा कैक कृतींवर चाप बसलेला नाही. काही दिवसांपूर्वीच कोल्हापुरात घडलेल्या घटनेनंतर आता रायगड जिल्ह्यातील पेण इथंसुद्धा जादूटोणा केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.

रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यात असलेल्या नाडे गावात पैशाचा पाऊस पाडण्यासाठी जादूटोणा करण्याचा प्रकार ग्रामस्थांच्या सतर्कतेमुळे उघडकीस आला. स्मशानभूमीत मध्यरात्रीनंतर पैशांचा पाऊस पाडण्यासाठी जादूटोणा करण्याचा प्रकार सुरू होता ही बातमी समजताच स्थानिक ग्रामस्थांनी स्मशानभूमीत धाव घेतली. तिथं जाऊन जादूटोणा करणाऱ्या व्यक्तींना हटकले असता हा अघोरी प्रकार करणाऱ्या टोळीने ग्रामस्थांच्या अंगावर गाडी घालून पोबारा करण्याचा प्रयत्न केला.

योग्य वेळी तिथं पेण पोलिसांनी धाव घेत या टोळीतील तिघांना जेरबंद केलं. ज्यानंतरस त्यांचे इतर साथीदार फरार असल्याची माहिती समोर येत आहे. नवी मुंबई आणि गावातील काही स्थानिकांकडून स्मशानभुमी शेडमध्ये प्रेत जाळण्याच्या ठिकाणी एका जिवंत व्यक्तीला फिरवत होते. नारळ, लिंबु, शंख, मानवी कवटी, अगरबत्ती , डमरू, पेटलेला नारळ,



गोमुत्र भगवे कापड , होमाच्या समिधा, हातातील नाडा, भस्माची डबी इत्यादी साहित्यांचा वापर करुन हा प्रकार सुरू होता. मात्र तो ग्रामस्थांच्या सतर्कतेमुळे उघड झाला. याप्रकरणी जादूटोणा विरोधी कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून फरार लोकांचा शोध सुरू आहे.

**कोल्हापुरातही घडलेली अशीच एक घटना...**

कोल्हापुरच्या भुदरगड तालुक्यात काही दिवसांपूर्वीच आकुर्डे - महालवाडी दरम्यान असणाऱ्या कुराण नावाच्या शेतातील गवताच्या माळावर अघोरी जादूटोण्याचा प्रकार उघडकीस आला. तिथं असणाऱ्या बाभळीच्या झाडाला लिंबू, दाभण, बाहुल्या अडकवण्यात आल्या होत्या. बाभळीच्या झाडावर दाबण, लिंबूमधून काही शालेय मुलींसह व्यक्तींचे फोटो देखील लटकवल्याचं समोर आलं, ज्यानंतर या परिसरात भीतीचं वातावरण पसरलं होतं.



## संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# 'मराठा विद्याप्रसारक'वर काळा डाग!

रयत शिक्षण संस्थेनंतर राज्यात सर्वात मोठी शिक्षण संस्था म्हणून लौकिक असलेल्या मराठा विद्याप्रसारक समाज या नाशिक जिल्ह्यातील संस्थेला पदाधिकाऱ्यांच्या गैरकारभारामुळे डाग लागला आहे. गुणवत्ता आणि दर्जा यांचे दाखले ज्या संस्थेबाबत दिले जात होते, त्याच संस्थेतील पदाधिकारी जेव्हा बेकायदेशीर बाबींचे धडे आपल्या कर्मचारी वर्गालाच देतात, तेव्हा संस्थेची बदनामी तर होणारच! या गैरव्यवहाराला सरकारी अधिकाऱ्यांची साथ लाभणे ही आणखी दुर्दैवी बाब. प्रामाणिक करदात्यांच्या पैशांवर डल्ला मारून, बनावट लाभार्थ्यांच्या माध्यमातून योजनांचे वाटोळे करण्याचा उद्योग अशा काही संस्थांनी आणि सरकारी अधिकाऱ्यांनी केला आहे. मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना खरंतर बेरोजगार युवकांना रोजगार मिळवून देण्यासाठी होती, पण इथे प्रत्यक्ष काम करणाऱ्या कर्मचारी वर्गालाच लाभार्थी दाखवून सरकारी पैशांची उधळपट्टी करण्यात आली. हे करताना बेरोजगारांच्या तोंडातील घास हिरावल्याचे शल्य ना संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना जाणवले, ना सरकारी अधिकाऱ्यांना. आता या घोटाळ्यात आपला सहभाग कसा नाही, हे दाखवण्याची पदाधिकारी सारवासारव करत आहेत.वास्तविक, योजनेसाठी यादी संस्थेतूनच गेली. केवळ यादीच नव्हे, तर बेरोजगारांच्या प्रशिक्षणासाठी उपस्थितीही दर्शवण्यात आली. त्यातून दोन हप्ते कर्मचारी वर्गाच्या खात्यावर जमा झाले. यात कर्मचारी दोषी आहेत का? तर अजिबातच नाही. 'करून गेला गाव...' सारखी अवस्था संबंधित कर्मचारी वर्गाची आहे. या कर्मचाऱ्यांना ठावूकच नाही की त्यांच्या बँक खात्यावर सरकारने पैसे का जमा केले? त्यांच्या नावांची यादी अकाउंट नंबरसह संस्थेच्या कार्यालयाने पाठवली होती. तरीही यात गैरव्यवहार झालेला नाही, असा जो कांगावा केला जात आहे तो निरर्थकच ठरतो. मात्र, मविप्रने सरकारी अधिकाऱ्यांच्या 'आशीर्वादाने' या योजनेत वर्षानुवर्षे काम करणाऱ्या कर्मचारी वर्गाची नावे घुसडली. ही केवळ फसवणूक नव्हे, तर सरळसरळ अपहार आहे. ज्या अधिकाऱ्यांनी हे सर्व पाहिले आणि त्यावर लक्ष दिले, त्यांनीही या संस्थेतील कर्मचारी वर्गाकडून वसुली करण्याचा देखावा उभा केला, मात्र दोषींवर अद्याप कुठलीही कायदेशीर कारवाई केलेली नाही. मुळात जेव्हा गुन्हा झाल्याचे सिद्ध होत आहे, त्यावेळी या गुन्ह्यात सहभागी असणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई होणे अपरिहार्यच आहे. परंतु ते न झाल्यानेच सरकारी अधिकाऱ्यांवर संशय व्यक्त होत आहे. 'आम्हाला वाटले संस्थेतील कर्मचारी वर्गाला प्रशिक्षण देण्यासाठी हा भत्ता असेल. म्हणून आम्ही या योजनेसाठी कर्मचाऱ्यांची नावे पाठवली', असे जे हास्यास्पद आणि तितकेच बालीश समर्थन सध्या पदाधिकाऱ्यांकडून केले जात आहे, त्यावर कोण विश्वास ठेवणार? योजनेचा अभ्यास न करताच कुणी संस्थेच्या कर्मचारी वर्गाची नावे अकाउंट नंबरसह पाठवेल का? शासकीय आदेश न समजण्याइतके निर्बुद्ध लोक संस्थेत पदे उपभोगत आहेत का? की, सगळे कळूनही जाणीवपूर्वक केलेला हा संघटित गुन्हा आहे? खरेतर, या घोटाळ्यात केवळ एकावर कारवाई होऊन चालणार नाही. तर जे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सभापती, उपसभापती, सरचिटणीस आणि चिटणीस यांसह उर्वरित पंधरा संचालक आहेत, त्यांनाही कायद्याचा बडगा दाखवणे गरजेचे आहे, जेणेकरून यापुढे संस्थेत गैरकृत्य होत असताना त्यास ही मंडळी मूकसंमती तरी देणार नाहीत. या प्रकारावरून लक्षात येते की, राज्यात योजना जाहीर होतात, त्यावर करोडोंचा खर्च होतो, पण अंतिमतः त्या योजना राजकीय स्वार्थासाठी आणि संस्थांच्या लबाड व्यवस्थापनासाठी कुबेराचा खजिना ठरतात. शेतकऱ्यांसाठी असलेल्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेतदेखील तामिळनाडूमध्ये मोठा घोटाळा झाला होता. तिथे बनावट लाभार्थ्यांच्या नावे पैसा वितरित झाल्यावर सरकारने तातडीने कारवाई करून दोषींना गजाआड केले. मात्र, महाराष्ट्रात मात्र सगळे चोर सगळ्यांना परिचित आहेत, त्यामुळे कोणी कोणाला शिक्षा करत नाही! मविप्र ही केवळ एक शैक्षणिक संस्था नाही, तर शिक्षण व्यवस्थेचा एक मोठा स्तंभ आहे. मात्र, या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी शासनाच्या डोळ्यात धूळ फेकून आपल्या कर्मचारी वर्गाची नावे योजनांमध्ये घुसडली, हे म्हणजे 'स्वतःच्या घराला आग लावून त्यात शेजाऱ्याला भाजण्यासारखे' आहे. या घोटाळ्यात आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे निव्वळ कागदोपत्री घोडे नाचवण्याचा प्रकार. योजना सुरू करताना लाभार्थी निश्चित करण्याच्या प्रक्रियेत संबंधितांचे आधार कार्ड, पॅनकार्ड, शैक्षणिक पात्रता आणि बेरोजगार असल्याचा पुरावा तपासला गेला का? संबंधितांना प्रत्यक्ष भेटून त्यांची पात्रता पडताळण्यात आली का? उत्तर आहे - नाही! सरकारच्या अधिकारी मंडळींनी राजकीय मंडळींच्या प्रभावाखाली येऊन कागदावरच्या सोयीस्कर खोट्या नोंदींवरच योजना राबवली. अधिकाऱ्यांना पूर्ण माहिती असूनही त्यांनी कोणतीही कठोर कारवाई केली नाही. कुठल्याही गुन्ह्यात दोषींवर गुन्हे दाखल होण्याची प्रक्रिया तातडीने होते. मग येथे ते का झाले नाही? मविप्र संस्थेच्या संचालक मंडळाने मोठा घोटाळा करूनही गेलेल्या पैशाच्या वसुलीवर केवळ जोर दिला जातो आणि विषय संपवला जातो. मग चोर पकडल्यावर त्याला शिक्षा का नाही?




आताचा जमाना आहे, तो इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा... आणि आपणच हळूहळू या उपकरणांचे गुलाम बनत चाललो आहोत. व्हिडीओ कॉलद्वारे रोजच समोरासमोर संवाद होत असतात. Group call करून एखाद्या कट्ट्यावर बसल्यासारख्या तासंतास मित्र-मैत्रिणींच्या गप्पा रंगतात. GPS आपल्याला कमी वेळात योग्य ठिकाणी घेऊन जातो. एखादी गोष्ट येत नसेल तर ती युट्यूबवर बघून करता येते.

समाज माध्यमं म्हणजे अप्रत्यक्षपणे एकमेकांपर्यंत माहीतीद्वारे पोहोचण्याची साधने. ज्यात प्रचंड उर्मी आहे एकत्रित खेचण्याची. उदा. वर्तमानपत्रं, मासिकं, रेडिओ, टेलीव्हिजन, इंटरनेट, फोन, मोबाइल, वेबसाइट इत्यादी इत्यादी...

वर्तमानकाळापेक्षा भूतकाळात महिलांचं समाज माध्यम हे आमने-सामने असायचं. पूर्वीच्या काळात सुखसोयी नसायच्या आणि साहजिकच वार्षिक पुरवठ्याची कामे उदा. पापड, कुरडया, मसाले करणे हे एका बाईच काम नसायचं व या कामी एकमेकांची मदत लागायची. त्यानिमित्ताने शेजारीपाजारी महिला मदत म्हणून यायच्या. हेच पूर्वीच्या काळात त्यांचं समाज माध्यम होतं. कधी विहिरीवर पाणी आणायला जाता येता, हळदीकुंकूच्या निमित्ताने अथवा गौरी-गणपती / महालक्ष्मी पूजेच्या निमित्ताने एकत्र येणंही महिलांसाठी एक पर्वणीच होती.

पूर्वीच्या काळात महिलांना मोकळेपणाने बोलून स्वतःच मत मांडायचं किंवा निर्णय घ्यायचं स्वातंत्र्य नव्हतं. कायम दडपणाखाली वावरत होत्या आणि जेव्हा कधी त्या या ना त्या कारणाने एकत्र आल्या की मग आपापल्या विचारांची देवाणघेवाण व्हायची. स्वतःची मतं मोकळेपणाने एकमेकांसमोर मांडली जायची. आपापल्या भावना व्यक्त करायची संधी मिळायची. चर्चा व्हायची आणि अशाप्रकारे मन हलकं होऊन, नवीन दिशा मिळायची व येणाऱ्या पुढील दिवसाला सामोरं जाण्याची शक्ती मिळायची.

पूर्वीच्या काळी सणासुदीच्या निमित्ताने किंवा काही खास कार्यक्रमानिमित्ताने महिलांना माहेरी जायची संधी कधीतरी मिळायची. आपल्या माणसांच्या गाठीभेटी व्हायच्या. एखादी गोष्ट शिकायची तर, वर्ग लावून शिकून घ्यावं लागायचं, बाहेरगावी जायचं तर त्या गावचा नकाशा सोबत घेऊन जायला लागायचं. परदेशात रहाणाऱ्या मुलांकडून येणाऱ्या टपालची वाट आतुरतेने पाहात पालकाना बसावं लागायचं.

परंतु आता जीवनशैली बदलली आहे. आताचा जमाना आहे, तो इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा... आणि आपणच हळूहळू या उपकरणांचे गुलाम बनत चाललो आहोत. व्हिडीओ कॉलद्वारे रोजच समोरासमोर संवाद होत असतात. Group call करून एखाद्या कट्ट्यावर बसल्यासारख्या तासंतास मित्र-मैत्रिणींच्या गप्पा रंगतात. GPS आपल्याला कमी वेळात योग्य ठिकाणी घेऊन जातो. एखादी गोष्ट येत नसेल तर ती युट्यूबवर बघून करता येते. योगा वर्ग / नाचगाण्याचा वर्ग / चित्रकला / हस्तकला / शिक्षण / शिकवणी / नोकरी... सगळं काही सोपं झालं आहे, घरी बसून करण्यासारखे. परदेशात असलेल्या नातेवाईकांना लग्नासारख्या कार्यक्रमात online सहभागी होता येत. मध्यंतरी कोविडसारख्या महामारीच्या कठीण काळातसुद्धा, बाहेरगावी असलेल्या भक्तांनी गणपतीच्या आरत्यापण online करून समाधान मानलं. ही प्रथा यापुढे हळूहळू अशीच तर चालू रहाणार नाही ना, ही खंत मनाशी कायम राहील.

तर, अशी ही माध्यमं कुठपर्यंत फायद्याची आहेत की तोट्याची, ही ज्यांच्या-त्यांच्या विचार पातळीवर अवलंबून राहील. परंतु सर्व काही online असंच चालू राहिलं तर, मग पुढील पिढीला आपल्या "family tree"ची कशी काय ओळख राहील? पुढील पिढीला आपले नातेसंबंध सांभाळणं आणि ते टिकवणं यासाठी Whatsapp, Facebook, Messanger, Instagram. Twitter, Video call, Zoom meet, Google meet, net surfing याशिवाय गत्यंतर नाही आणि असे हे विविध प्रकार माणसांच्या दैनंदिन आयुष्यात महत्त्वाचं स्थान बळकावून बसली आहेत. आपला ७५ टक्के दिवस नक्कीच या माध्यमांवर जात असेल. हे माध्यम जेवढं उपयोगी आहे, तेवढं धोकादायकही आहे. महिलांनी तर अशा माध्यमाचा पुरेपूर फायदा उचलून आपली प्रचंड प्रगती करून घेतली. स्वतःचा लघु उद्योग सुरू केला. Group स्थापन करून स्वतःच्या तयार मालाची online विक्रीसुद्धा सुरू केली. बँकेचे व्यवहार त्या स्वतंत्रपणे हाताळू शकतात. हे माध्यम महिलावर्गाना प्रोत्साहित करणारे ठरते.

TV सिरीयलमध्ये महिलांची भूमिका ही नेहमी एक तर सोज्वळ असते नाहीतर, कजाग, बंडखोर प्रवृत्तीची असते. याचा प्रभाव कित्येक कुटुंबांवर होतो. जे करमणूक म्हणून बघतात ते या गोष्टीचा जास्त विचार करत नाहीत; परंतु जे जगात असंही घडत का, हा विचार एकतर्फी करून डोकं पोखरत असतात ते मात्र संकटात येतात. TV serial हे सगळं काल्पनिक करमणुकीचा भाग असतो. प्रेमप्रकरणं हे याचंच एक ज्वलंत उदाहरण आहे, जे अशा माध्यमातून मुला-मुलींना एकत्र आणतं. अशा माध्यमातून एखादीचं नशीब चमकून जातं, पण एखादी वर-वर दिसणाऱ्या देखाव्याला भुलून हुरळून जाते. या मायाजाल विश्वात गुरफुटून जाऊन कित्येक जण स्वतःच्या आयुष्याचं वाटोळं करून घेतात. Whatsapp, Face book, Twitter या रंगमंचावरचे हे चेहरे असतात. पडद्याच्या मागे खरं रूप बघायला, त्यांची बुद्धी हरवलेली असते; म्हणून तात्पुरत्या आमिषाला बळी न पडता, क्षणिक सुखाचा विचार न करता लांबचा विचार करावा. कारण जेव्हा तो पडदा उघडला जातो, तेव्हा इतर सर्व दरवाजे त्यांच्यासाठी बंद होतात. मग सुटकेचा मार्ग असतो, तो एकतर समर्पण करणं अथवा आत्महत्या... नकार दिलाच तर मग भररस्त्यावर एक तर खून होतो, एसिड फेकल जातं, अत्याचार केले जातात नाहीतर मग विक्री... तिच्या भावनांचा, तिच्या मनाचा, तिच्या आशाआकांक्षांचा, तिच्या स्वप्नांचा विचार कुठं होतो? ती राहते एक खेळणं बनून, एक कठपुतली बनून..

म्हणून मायबापांनो आपल्या पाल्याला जरूर मोबाइल द्या, इंटरनेट द्या परंतु त्यांच्या नकळत आपल्या मुलांच्या हालचालीवर लक्ष द्या. चेहऱ्यावरील भाव खूप बोलके असतात, नीट बारकाईने बघितलं तर तुम्हाला वाचता येतील त्यांच्या मनातील विचार. त्यांचे मित्र-मैत्रिणी बना. काहीतरी निमित्ताने मोबाइल chÔt तपासा. ते कुठं जातात, कोणाबरोबर जातात, संगत कशी आहे... याची त्यांच्या नजरेआड चौकशी करत चला. कारण मुलांपेक्षा आपल्या मुली जास्ती नाजूक असतात, त्या कळीला हळूहळू तिच्या कलेने, आनंदाने उमलू द्या, आकाशात उंच भरारी घेऊ द्या.. कारण आजची मुलगी ही उद्याची स्त्री आहे, माता आहे आणि विश्वाची जननी आहे.. तिचं जतन व्हायलाच हवं...

# ध्रुवीय अस्वलांचा बर्फरोध

परिसरातील परिस्थितीशी आणि पर्यावरणाशी जुळवून घेण्यासाठी सजीवांच्या शरीरामध्ये, तसेच जगण्याच्या पद्धतीमध्ये कालानुरूप काही बदल घडून येतात. यालाच 'अनुकूलन' असे म्हणतात. उदाहरणार्थ, बर्फाळ प्रदेशात राहणारी ध्रुवीय अस्वले, पांढरा कोल्हा, पर्वतीय शेळी, चंदेरी कोल्हा, सायबेरियन हस्की कुत्रा, हिमबिबळ्या या प्राण्यांच्या शरीरावर केसांचे दाट आवरण असते. केसाळ आवरणाचा पांढरा किंवा चंदेरी रंग बर्फाशी मिळताजुळता असल्याने हे प्राणी बर्फाळ प्रदेशात सहजपणे दृष्टीस पडत नाहीत आणि त्यामुळे त्यांचे संरक्षण होते. ध्रुवीय अस्वलांच्या शरीरावर असलेल्या पांढऱ्याशुभ्र केसाळ आवरणाचे तापमान पाण्याच्या गोठणबिंदूपेक्षा बरेच कमी असते. याच कारणामुळे इन्फ्रारेड म्हणजेच अवरक्त कॅमेरामधून ध्रुवीय अस्वलांची छायाचित्रे टिपता येत नाहीत. विशेष म्हणजे, शरीराच्या बाह्य आवरणाचे तापमान इतके कमी असूनसुद्धा या अस्वलांच्या केसाळ शरीरावर बर्फाचे आवरण तयार होत नाही. ध्रुवीय प्रदेशात



वास्तव्य करणाऱ्या कस्तुरी बैलापासून ते अगदी मानवापर्यंत अनेक सस्तन प्राण्यांच्या शरीरावरील केसांमध्ये बर्फ जमा होतो. पण, ध्रुवीय अस्वलांच्या केसाळ शरीरावर मात्र बर्फ कसा जमत नाही, हे गूढ होते. नॉर्वेच्या बर्गन विद्यापीठातील शास्त्रज्ञांना हे गूढ उकलण्यात यश आले आहे. त्यांनी केलेल्या संशोधनानुसार, ध्रुवीय अस्वलांच्या केसांच्या मुळाशी असलेल्या केशकुपींमध्ये असलेल्या ग्रंथींमधून 'सेबम' हा तेलकट पदार्थ स्त्रवतो. या अस्वलांनी आपली त्वचा थोडीशी जरी झटकली, तरी केसांवरचा सगळा बर्फ ताबडतोब गळून पडतो.

# ट्रम्प यांना आवडे पाकिस्तान?

अशा मित्रांपेक्षा शत्रू काय वाईट, या आशयाचे एक वचन सर्वश्रुत आहे. डोनाल्ड ट्रम्प हे भारताचे घनिष्ठ मित्र आहेत अशी समजूत आपल्याकडे त्यांच्या पहिल्या कार्यकाळापासूनच करून दिली जात होती. त्यातूनच 'अब की बार ट्रम्प सरकार' असा नारा आपल्याकडे दिला गेला. त्या वेळी भारताबद्दलच्या त्यांच्या तक्रारींचा सूर लाडिक होता. 'किती ते शुल्क तुमच्याकडे हो...' असे ट्रम्प तेव्हाही म्हणायचेच. पण त्या वेळचे ट्रम्प आणि दुसऱ्यांदा अध्यक्षपदावर निवडून आलेले ट्रम्प यांच्यात मोठी तफावत आहे.

नवे ट्रम्प मित्रांनाच अधिक झोंबरे फटकारे लगावतात. एकदा नव्हे, तर अनेकदा. भारताचा उल्लेख ते 'ब्यूटिफुल कंट्री' असा करतात. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना 'माय फ्रेंड' असे समक्ष किंवा परोक्ष संबोधतात. त्यामुळेच अलीकडच्या मोदी-ट्रम्प भेटीतून परस्परसौहार्द अधिक वृद्धिंगत होईल अशी सर्वांचीच समजूत झाली. प्रत्यक्षात मोदी यांच्या समक्ष, तसेच ते भारतात परतल्यानंतर जवळपास प्रत्येक दिवशी, न चुकता, भारत सरकार अमेरिकी वस्तूंवर किती अन्याय्य शुल्क किंवा टॅरिफ आकारते असे मिळेल त्या व्यासपीठावर ट्रम्प सांगत असतात. मेक्सिको, कॅनडा किंवा चीनप्रमाणे भारतालाही धडा शिकवणार हे ते थेट बोलत नाहीत इतकाच काय तो दिलासा. 'टॅरिफ लावणारच. अमेरिकेला कोणी किरकोळीत घेऊ नये. आमच्या वस्तूंवर कर लावता, मग आम्हीही लावणार. आता भारताचेच बघा ना...' अशी प्रस्तावना त्यांच्या जवळपास प्रत्येक भाषणात असते. इतके जर त्यांना भारतातील टॅरिफने पछाडले आहे, तर ट्रम्प भारताचे मित्र कसे काय ठरू शकतात, याविषयी चर्चा आपल्याकडे अजून का सुरू झाली नाही हे मोठे कोडेच. बेकायदा स्थलांतरितांबाबतही अमेरिकेचे भारताविषयीचे धोरण न्यायनिष्ठुर आहे. त्यात वावगे काही नाही, पण 'मित्र' देशाकडून यापेक्षा अधिक समजूतदारपणाची अपेक्षा असते.

ती अपेक्षा सध्याचे अमेरिकी प्रशासन पूर्ण करू शकेल असे दिसत नाही. कारण या गृहस्थाने 'शत्रू', 'मित्र', 'मित्रही नाही शत्रूही नाही' अशा व्यामिश्र चौकटींमधली सीमारेषाच पुसून टाकली आहे. त्यामुळेच बुधवारी अमेरिकी काँग्रेससमोर केलेल्या 'स्टेट ऑफ द युनियन' भाषणात ट्रम्प यांनी भारताला बोल लावलेच, त्याच वेळी पाकिस्तानचे मात्र आभार मानले. २०२१ मध्ये काबूल विमानतळावर झालेल्या बॉम्बहल्ल्यात अमेरिकेचे १३ सैनिक मारले गेले होते.

या हल्ल्याच्या सूत्रधाराला पाकिस्तानच्या प्रयत्नांनी आणि मध्यस्थीने अमेरिकेच्या हवाली केले जात आहे. 'पाकिस्तान सरकारचे मनापासून आभार,' अशा शब्दांत ट्रम्प यांनी कृतज्ञता व्यक्त केली. त्याचबरोबर, पाकिस्तानकडील एफ-१६ लढाऊ विमानांच्या देखभालीसाठी जवळपास ४० कोटी अमेरिकी डॉलरची मदतही पाकिस्तानला दिली जाणार आहे. त्यात ही विमाने पाकिस्तानात दहशतवादविरोधी कारवायांसाठी वापरली जातील, याची हमी पाकिस्तानने द्यावयाची आहे.

पाकिस्तानाच्या दहशतवादविरोधी कारवाया प्राधान्याने अफगाण सीमेला लागून असलेल्या खैबर पख्तूनख्वा प्रांताच्या सीमावर्ती भागात सुरू असतात. तेथील दहशतवाद्यांच्या विरोधात एफ-१६ सारखी लढाऊ विमाने का आणि किती लागणार हा संशोधनाचा विषय ठरतो. ही विमाने भारताविरुद्ध वापरली जाऊ नयेत, हा मूळ उद्देश असल्याचे सांगितले जाते. त्यावर लक्ष ठेवण्याची इच्छाशक्ती आणि निकड विद्यमान अमेरिकी प्रशासनाला आहे असे वाटत नाही.

विशेष म्हणजे ट्रम्प यांनीच २०१८ मध्ये ही मदत रोखून धरली होती. केवळ या एका भाषणाने अमेरिकेच्या परराष्ट्र आणि सामरिक धोरणाची दिशा बदलली असे म्हणता येत नाही. पण अलीकडच्या काळात कोणत्याच अमेरिकी प्रशासनाच्या खिजगणतीत नसलेल्या पाकिस्तानसारख्या देशाचा उल्लेख आणि अमेरिकेला मित्र मानणाऱ्या भारताचा उल्लेख यांतील तफावत उल्लेखनीय आहे.

ट्रम्प यांनी भारताला एफ-३५ लढाऊ विमाने घेण्याविषयी आग्रह केला आहे. ते भारताची सामरिक निकड आहे म्हणून नव्हे (तशी ती सध्या तरी नाहीच), तर त्यामुळे भारताशी व्यापारी तूट कमी होईल म्हणून! तेव्हा आपण, आपल्या नजरेतून अमेरिका आणि अमेरिकेची व्यापार दंडेली इतकीच मर्यादित दृष्टी असलेल्या एका शक्तिशाली नेत्याकडून किती आणि काय अपेक्षा ठेवायच्या याचा अदमास येथील नेतृत्वाला सातत्याने लावत राहावा लागेल. पाकिस्तानविषयी ट्रम्प यांना अचानक ममत्व कसे वाटू लागले, ही बाब त्यामुळे दुर्लक्षण्यासारखी ठरत नाही.

# मुंडेंचा राजीनामा, फडणवीस ठरले कडक मास्तर

**तू इधर उधर की न बात कर, ये बता कि काफिला कैसे लुटा? मुझे रहजनों से गिला नही, तेरी रहबरी का सवाल है, देवेंद्र फडणवीसांबद्दल असा प्रश्न अर्थसंकल्पीय अधिवेशनात विरोधकांकडून उपस्थित होण्यापूर्वीच त्यांनी धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेतला आहे. ठाकरे गटाने आम्हाला फडणवीसांच्या इमेजची चिंता आहे, असे म्हटले. फडणवीसांची प्रतिमा एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या मंत्र्यांमुळे खराब होऊ नये याची काळजी ते घेत असल्याचं दिसत आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात आणखी ह्यमुंडेह्ण समोर आले तर नवल वाटायला नको.**



संतोष देशमुख यांच्या हत्येचे फोटो आणि व्हिडीओ समोर आल्यानंतर महाराष्ट्राच्या राजकारणात एवढी निर्घृण आणि निर्दयी हत्या आजपर्यंत घडली नसेल अशीच भावना राज्यातील नागरिकांची झाली. धनंजय मुंडे यांचा महायुती सरकारमध्ये दुसरा शपथविधी होण्याच्या आठ दिवस आधी हे हत्याकांड घडले.

त्यानंतरही त्यांना मंत्रिमंडळात स्थान देण्यात आले, मात्र तीन महिन्यांत महायुतीची त्रेधातिरपीट उडाली आणि अखेर धनंजय मुंडेंना पायउतार व्हावे लागले. त्यांच्या राजीनाम्यासाठीचा मुहूर्त देवेंद्र फडणवीसांनी मात्र अगदी योग्य निवडला. अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्याच दिवशी मुंडेंचा राजीनामा झाला. यामुळे देवेंद्र फडणवीसांची इमेज 'कडक मास्तर'ची झाली आहे. याआधी शंकरराव चव्हाणांना हेडमास्तर म्हटले जात होते, ते त्यांच्या शिस्तप्रिय वागणुकीसाठी, मात्र तो काळ आता संपला आहे.

महायुती सरकारमधील ६२ टक्के लोकप्रतिनिधी आणि मंत्री हे गुन्हेगारी पार्श्वभूमीचे आहेत. यांच्यावर मोर्चा आणि आंदोलनाचे गुन्हे नाहीत, तर खून, दरोडा, महिलांवर अत्याचार असे गंभीर गुन्हे आहेत, मात्र या सरकारचा चेहरा असलेले देवेंद्र फडणवीस यांची इमेज मुंडेंच्या राजीनाम्यामुळे हातात छडी असलेल्या मास्तरची बनली आहे. त्यामुळे यापुढे एखादा/एखादी मंत्री किंवा लोकप्रतिनिधी यांच्यावर भ्रष्टाचार, गुन्हेगारी स्वरूपाचा आरोप झाला तर त्यांचाही ह्यमुंडेह्ण होणार, असा संदेश तेवढा गेला आहे.

बीड आणि धनंजय मुंडे हे वेगळे केले जाऊ शकत नाहीत. त्यातच परळी आणि मुंडे हे तर कित्येक दशकांचे समीकरण आहे. त्यामुळे बीडमधील प्रत्येक राजकीय, सामाजिक, औद्योगिक घटना घडामोडींसाठी मुंडे हे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष जबाबदार आहेतच.

त्यामुळेच ९ डिसेंबर २०२४ रोजी बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृणपणे हत्या झाल्यानंतर या हत्येची नैतिक जबाबदारी स्वीकारून धनंजय मुंडे यांचा राजीनामा मागितला जात होता, मात्र माझा प्रकरणाशी काहीही संबंध नाही, असा कांगावा करणाऱ्या धनंजय मुंडे यांचा सर्वाधिक निकटवर्तीय वाल्मिक कराड हाच हत्येचा सूत्रधार असल्याचे समोर आले.

धनंजय मुंडे यांचे पानही वाल्मिक कराडशिवाय हलत नाही, असे खुद्द त्यांची बहीण मंत्री पंकजा मुंडे सावरगाव येथील दसरा मेळाव्यात म्हणाल्या. तरीही धनंजय मुंडे हे मी हत्या प्रकरणात दोषी नाही, माझ्यावर आरोप नाही, एवढीच एक सबब सांगून मंत्रिपद वाचवू इच्छित होते, मात्र जेव्हा सीआयडीने आरोपपत्र दाखल केले तेव्हा ज्यांच्याशिवाय धनंजय मुंडेंचे पानही हलत नाही तोच वाल्मिक कराड हत्येचा मुख्य सूत्रधार असल्याचे निष्पन्न झाले.

एवढेच नाही तर अवादा कंपनीकडे मागण्यात आलेल्या दोन कोटींच्या खंडणी प्रकरणातूनच हत्या झाल्याचाही आरोप चार्जशीटमध्ये आहे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे चार्जशीटसोबत जोडलेले संतोष देशमुख यांचे फोटो. आरोपी महेश केदारच्या फोनमधून जवळपास १५ व्हिडीओ आणि ८ फोटो जप्त करण्यात आले. त्यामध्ये संतोष देशमुख यांना होणारी अमानुष मारहाण आणि सुदर्शन घुले, कृष्णा आंधळे (हा अजूनही फरार आहे. याचा शोध अद्याप का लागत नाही याचेही उत्तर सापडलेले नाही.), महेश केदार, विष्णू चाटे, सुधीर सांगळे हे सर्वच धनंजय मुंडे यांच्याच जवळचे निघाले आहेत.

खंडणीसाठीची बैठक ही धनंजय मुंडे यांच्या सातपुडा या शासकीय निवासस्थानी झाल्याचा आरोपही आमदार सुरेश धस यांनी अनेकदा केला, तरीही माझा काही संबंध नाही, असे म्हणत तीन महिने धनंजय मुंडेंनी रेटून नेले.

मुंडेचा राजीनामा घेण्याची जबाबदारी मुख्यमंत्र्यांनी सुरुवातीलाच अजित पवारांवर ढकलली होती, पण अजित पवार मुंडेंच्या राजीनाम्याची मागणी फेटाळत आले. स्पष्टवक्तेपणासाठी प्रसिद्ध असलेले उपमुख्यमंत्री अजित पवार मुंडे प्रकरणात मात्र बोटचेपी भूमिका घेत आहेत, असा आरोप होत होता.

सुरेश धस हे भारतीय जनता पक्षाचे आमदार, बजरंग सोनवणे आणि संदीप क्षीरसागर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे खासदार आमदार, सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया या सर्वांनी धनंजय मुंडे आणि वाल्मिक कराड यांच्या संबंधीचे विविध पुरावे अजित पवारांना दिल्यानंतरही त्यांनी भूमिका घेतली नाही. एवढेच कशाला त्यांच्याच पक्षाचे राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार प्रकाश सोळंके यांनीही या प्रकरणाचा तपास होईपर्यंत धनंजय मुंडेंनी मंत्रिपदापासून दूर राहणे योग्य असल्याचे म्हटले होते, पण स्वपक्षीयांचाही सल्ला अजित पवारांनी ऐकला नाही.

संतोष देशमुख हत्याकांडानंतर मंत्रिमंडळाचा विस्तार झाला. त्यानंतर झालेल्या हिवाळी अधिवेशनात भारतीय जनता पक्षाचे आमदार सुरेश धस यांनी सभागृहात या हत्याकांडाची माहिती दिली. त्यासोबतच याविरोधात आवाज उठवणारे दुसरे आमदार राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे जितेंद्र आव्हाड होते.

धस आणि आव्हाड यांनी हिवाळी अधिवेशनात हत्याकांडाबद्दल जे जे सांगितले ते सोमवार ३ मार्च रोजी रात्री उशिरा समोर आलेल्या फोटोंच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्राने पाहिले. त्यानंतर जनतेचा उद्रेक होण्यापूर्वीच धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेण्यात आला. या राजीनाम्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्वप्रथम माध्यमांना दिली. त्यानंतर अजित पवारांनी 'नैतिकतेच्या आधारावर त्यांनी राजीनामा दिला' अशी एका वाक्यात त्यावर प्रतिक्रिया दिली.

ज्या पद्धतीने आमदार सुरेश धस या प्रकरणात सुरुवातीपासून काल-परवा चार्जशीट दाखल होईपर्यंत आक्रमक आहेत हे अजित पवारांच्या राष्ट्रवादीला रुचलेले नाही. अजितदादांच्या पक्षातील प्रवक्ते आणि काही आमदार हे वेळोवेळी धसांना महायुती धमार्चा दाखला देत होते. नंतर तेही धसांवर बोलायला लागले, मात्र आमदार सुरेश धसांना असलेला पक्षातील पाठिंबा काही कमी झाला नाही. त्यांना प्रदेशाध्यक्षांनी कधी बोलू नको म्हटले नाही तर कधीही त्यांच्या आरोपांपासून पक्ष वेगळा आहे, असेही म्हटले नाही.

आताही धनंजय मुंडे यांनी राजीनामा दिला असला तरी सुरेश धस हे त्यांच्याबद्दलच्या आरोपांवर बोलणे कमी करायला तयार नाहीत. खंडणी प्रकरणाची बैठक ही धनंजय मुंडे यांच्या सातपुडा बंगल्यावर झाली, त्याचीही चौकशी झाली पाहिजे, अशी त्यांनी मागणी केली आहे. त्याची चौकशी करून पुरवणी आरोपपत्र सादर करावे, असा पवित्रा आता सुरेश धसांनी घेतला आहे.

त्यासोबतच सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनीही वाल्मिक कराड आणि धनंजय मुंडे यांचे असलेले संबंध, त्याची कागदपत्रे समोर आणली. धनंजय मुंडे यांच्या कृषिमंत्रिपदाच्या कार्यकाळात झालेल्या भ्रष्टाचारावर त्यांनी बोट ठेवले. त्यासाठी त्यांनी जी काही कागदपत्रे उघड केली, ती अतिशय गोपनीय होती. तरीही दमानियांना ती कागदपत्रे कशी मिळाली हे सांगण्यासाठी कोणत्याही ज्योतिषाची गरज नाही. देवेंद्र फडणवीस यांना सध्या दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना सोबत घेऊन चालावे लागत आहे, मात्र हे सरकार चालवत असताना भाजपचं ड्रायव्हिंग फोर्स राहील याची दक्षता फडणवीस कायम बाळगत आहेत.


सुरुवातीच्या काही निर्णयांतून हे दिसून आले. १०० दिवसांचा फोकस कार्यक्रम त्यांनी सर्वच विभागांना दिला. त्यावेळी त्यांनी सर्व खात्यांच्या स्वतंत्र बैठका घेतल्या. यात महायुतीतील दोन्ही प्रमुख पक्षांच्या खात्यांचाही समावेश होता. एकनाथ शिंदे यांच्या कार्यकाळात झालेल्या एसटी बसची निविदा रद्द करण्यात आली आहे. तसेच काही निर्णय आणि प्रकल्पांची चौकशी सुरू केली आहे. पालकमंत्रिपदाच्या वादावर त्यांनी अद्याप तोडगा काढलेला नाही.

शिवसेना ठाकरे गट शिंदेच्या कार्यकाळात झालेल्या औषध खरेदीवर आक्रमक आहे. याच खात्याच्या मंत्र्यांच्या काळातील हजारो कोटींच्या कामांना फडणवीसांनी स्थगिती दिली आहे. अब्दुल सत्तार, तानाजी सावंत यांना मंत्रिमंडळातून दूर ठेवून योग्य संदेश फडणवीसांनी शिंदेंना दिलेला आहे, तर आता अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या तोंडालाच मुंडेंचा राजीनामा घेऊन अजितदादांच्या राष्ट्रवादीलाही न सांगता, न बोलता बरंच काही सांगितलं आहे.

# पनीर कटलेट

**साहित्य :** २०० ग्रॅम पनीर कुस्करून, २ मध्यम आकाराचे कांदे चिरून, १ गाजर किसून, १ वाटी बारीक चिरलेला कोबी, २ बटाटे उकडून कुस्करून, १ चमचा आले-लसूण पेस्ट, १ चमचा मिरची-कोथिंबीर पेस्ट, २ मोठे चमचे कॉर्नफ्लॉवर, गरजेनुसार मिठ, पाव ते अर्धा वाटी तेल, चाट मसाला.

**कृती :** भांड्यात तेल गरम करून त्यावर चिरलेला कांदा घाला. कांदा गुलाबी रंग येईपर्यंत शिजला की त्यावर



आले-लसूण पेस्ट व मिरची-कोथिंबीर पेस्ट घालून ढवळा. वरील मिश्रणावर कोबी, गाजर घालून २-३ मिनिटेच परतवत शिजवा. चायनीज पदार्थांसारखेच जास्त शिजू देऊ नका. आता कुस्करलेले बटाटे, मिठ घालून पुन्हा चांगले ढवळून लगेच गॅस बंद करा. हे मिश्रण एका ताटात पसरवा व जरा थंड होऊ द्या. मिश्रण थंड झाले की त्यात पनीर व कॉर्नफ्लॉवर टाकून मिश्रण एकजीव करा. आता तुम्हाला हव्या त्या आकाराचे कटलेट करा. व नॉनस्टिक पॅनवर जरासेच तेल घालून शॅलो फ्राय करून घ्या. दोन्ही बाजू मध्यम आचेवर साधारण ५-६ मिनिटे शिजवा. कटलेट तयार झाले की गरम असतानाच त्यावर चाट मसाला टाका. नुसते किंवा सॉस किंवा पुदिना चटणीबरोबर याचा आस्वाद घ्या.

**अधिक टिप :**

- **या कटलेटमध्ये इतर कोणतेही मसाले न वापरल्याने पनीर व भाज्यांचा अस्सल स्वाद येतो.**
- **लहान मुलांना तर खूपच आवडतात. शिवाय कोबीसारखी भाजी खाल्ली जाते.**
- **यात अजून कांद्याची पात, किंवा आपल्या आवडीच्या भाज्या थोड्या प्रमाणावर घालू शकता.**

# न्यूड मेकअप लूकसाठी काही टिप्स



**न्यूड मेकअप लूकचा सध्या खूपच वापर केला जातो. यासाठी ब्लॅक मस्कराचा वापर करा. आपल्याला त्वचेला सूट होईल असा नैसर्गिक रंग आणि गुलाबी रंगाच्या लिप कलरचा वापर करा. आकर्षक दिसण्यासाठी न्यूड मेकअप लूकसाठी कोणत्या टिप्सचा वापर केला पाहिजे, ते जाणून घ्या.**

- आपल्या डोळ्यांना नॅचरल लूक देण्यासाठी पापण्यांना ब्लॅक मस्करा लावा आणि केस कुरळे करा.
- डोळ्यावरच्या आतील कोपऱ्यापर्यंत काजळ लावा. त्यामुळे पापण्या सुंदर आणि आकर्षक दिसतील.
- गालावर नॅचरल चमक येण्यासाठी चीकबोन्सला हायलाइट करा. सध्या न्यूड मेकअप लूकसाठी आपल्या त्वचेला सूट होईल अशा नॅचरल शेडची निवड करा.
- यासाठी हलक्या रंगाचा वापर करा. चेहरा चमकण्यासाठी ओठांना हलक्या गुलाबी रंगाची पिंक शेडची लिपस्टिक लावून त्यावर शाईन येण्यासाठी लिप ग्लॉसचा वापर करा. त्यामुळे अजूनच आकर्षक लूक येईल.
- न्यूड मेकअप लूकसाठी एकाच रंगाच्या वेगवेगळ्या शेड्सचा वापर करा.
- न्यूड शेड्स लावण्याआधी लाईट बेस लावा आणि आवश्यक असल्यास हलक्या हातांनी लूज पावडर किंवा कॉम्पॅक्ट पावडर लावा.

# गरम पाणी पिण्याचे फायदे

**बहुतेक लोक आपल्या दिवसाची सुरुवात चहा किंवा कॉफीच्या गरमागरम कपाने करत असतात. काही लोकांना तर सकाळी उठल्या उठल्या चहा किंवा कॉफी मिळाली नाही, तर त्यांचा अख्खा दिवस वाईट जातो, इतकी त्यांना चहा किंवा कॉफीची सवय झालेली असते. पण या सवयीमुळे कालांतराने बद्धकोष्ठ, पोटदुखी, ॲसिडिटी, पिंपल्स अशा तक्रारी सुरू होतात. असे म्हटले जाते की त्वचा, केस आणि एकंदर शरीराचे आरोग्य सांभाळण्यासाठी भरपूर पाणी पिणे आवश्यक आहे. त्याचबरोबर सकाळी उठल्या उठल्या एक ग्लास गरम पाणी पिण्याची सवयही तुमच्या शरीरातील अनेक विकार मुळापासून दूर करू शकते.**

**सकाळी** उठून नियमितपणे एक ग्लास गरम पाणी प्यायल्याने पचन शक्ती चांगली राहते. तसेच गरम पाणी प्यायल्याने शरीरातील रक्ताभिसरणही चांगले राहते. आपल्या खाण्या-पिण्याच्या अयोग्य सवयींमुळे आपल्या शरीरामध्ये साठत असलेले घातक पदार्थ गरम पाण्याच्या सेवनामुळे बाहेर टाकण्यास मदत होते. तसेच गरम पाण्याच्या नियमित सेवनामुळे शरीरातील अतिरिक्त चरबी घटण्यास मदत होऊन वजन कमी होण्यास मदत होते. योगशास्त्राच्या नियमानुसार तीन महिने गरम पाण्याच्या सेवनाने वजन कमी होऊ शकते. याकरिता इतर कोणतीही विशेष पथ्ये पाळण्याची गरज नाही.

काही लोकांना बद्धकोष्ठाचा त्रास होतो. अशा वेळी सकाळी रिकाम्यापोटी गरम पाणी पिणे फायदेशीर ठरू शकते. पुष्कळ महिलांना मासिक धर्माच्या दिवसांमध्ये डोकेदुखी सतावते. त्यावेळी नियमित गरम पाण्याचे सेवन केल्याने डोकेदुखीपासून आराम मिळतो. तसेच या



दिवसांमध्ये होणारी पोटदुखी ही गरम पाण्याच्या सेवनामुळे कमी होते.

दररोज सकाळी एक ग्लास गरम पाण्यामध्ये थोडासा लिंबाचा रस घालून प्यायल्याने शरीराची रोगप्रतिकारशक्ती वाढते. ज्यांना सतत बारीकसारीक तब्येतीच्या तक्रारी जाणवत असतील त्यांनी गरम पाणी आणि लिंबाच्या रसाचे दररोज सेवन करणे उत्तम. यामुळे त्वचेचे आरोग्य देखील चांगले राहून, त्वचेवर पिंपल्स येणे कमी होते. तसेच गरम पाण्याच्या सेवनाने ॲसिडिटीचा त्रासही कमी होतो. पुष्कळ लोकांच्या खाण्या-पिण्याचे वेळापत्रक किंवा झोपेच्या वेळा अतिशय अनियमित असतात. शिवाय ज्या लोकांना काही ना काही कारणाने सतत प्रवास करावा लागतो. त्यांनाही बाहेरच्या जेवणावरच काम चालवून घ्यावे लागते. परिणामी ॲसिडिटीसारखे विकार पाठीमागे लागतात. अशा वेळी दररोज सकाळी गरम पाणी पिण्याच्या सवयीने ॲसिडिटीचे प्रमाण कमी होते.

# मासिक पाळी पुढे ढकलताय ?

**सण, समारंभ, पर्यटन किंवा धार्मिक कार्याच्या आड येणारी मासिक पाळी पुढे ढकलण्याचा निर्णय अनेक महिला घेतात. मात्र अशा प्रकारे निसर्गचक्रात हस्तक्षेप करणं चुकीचं आहे. बरंच प्रबोधन होऊनही मासिक पाळीबाबतचे गैरसमज कमी झालेले नाहीत. म्हणूनच महिलांना कृत्रिम पद्धतीने पाळी पुढे ढकलावी लागते. मासिक पाळी पुढे ढकलण्यासाठी गोळ्या घेतल्या जातात. पण या गोळ्यांचे शरीरावर दीर्घकालीन परिणाम होतात.**

- मासिक पाळी पुढे ढकलणाऱ्या गोळ्यांच्या सततच्या सेवनामुळे यासंदर्भातल्या नैसर्गिक चक्रावर परिणाम होऊ शकतो. शिवाय महिलांच्या प्रजननक्षमतेवरही याचे घातक परिणाम दिसून येतात.
- या गोळ्यांचं सेवन केल्यानंतर पुढचा काही काळ मासिक पाळीदरम्यान मोठ्या प्रमाणावर रक्तस्राव होण्याची शक्यता वाढते. जवळपास २० टक्के महिलांना हा अनुभव येतो. पुढचे काही महिने मासिक पाळीतून अधिक प्रमाणात रक्त जाऊ शकतं.
- या गोळ्या बऱ्याच काळपर्यंत घेत राहिल्यास आरोग्यावर अत्यंत घातक असे परिणाम दिसून येतात. नसांमध्ये रक्ताची गुठळी होण्यासारख्या समस्या जाणवू शकतात. या गोळ्यांमुळे इतर औषधांच्या शरीरावरच्या प्रभावावर विपरित परिणाम होऊ शकतो.
- या गोळ्या घेतल्यानंतर इतर काही दुष्परिणाम होऊ शकतात. जुलाब, हातापायांमध्ये गोळे येणं, अवेळी रक्तस्राव होणं हे दुष्परिणाम दिसून येऊ शकतात.



# कोरफडीचे ५ गुणकारी फायदे

**कोरफड त्वचेसाठी खूप फायदेशीर आहे. याच्या नियमित सेवनाने त्वचेसंबंधित अनेक समस्या दूर होतात. जाणून घ्या कोरफडीचे गुणकारी फायदे…**

- सतत कॉम्प्युटरसमोर बसल्याने डोळ्यांवर ताण येतो. डोळ्यांचे आरोग्य चांगले राहाण्यासाठी दोन चमचे कोरफडीचा गर एक कप पाण्यात मिसळून त्याने डोळे धुवा. यामुळे डोळ्यांना आराम मिळेल.
- चेहऱ्यावर पुटकुळ्या आल्यास कोरफडीचा गर चेहऱ्यावर लावा. थोड्या वेळाने चेहरा साध्या पाण्याने धुवा. यामुळे पुटकुळ्या कमी होतील.
- शरीरावर कापल्यामुळे जखम झाली असल्यास त्यावर कोरफडीचा गर लावा.
- कोंड्याची समस्या असल्यास दोन चमचे कोरफडीचा गर कंडिशनरसोबत मिसळा. यामुळे कोंड्यापासून सुटका होईल.
- दातांच्या हिरड्या मजबूत करण्यासाठी हिरड्यांवर कोरफडीचा गर लावा.

# जाणून घ्या टिकली लावल्याने होणारे फायदे

**टिकलीचाही महिलांच्या १६ शृंगारांमध्ये समावेश असून सौभाग्यवती महिला काही वर्षांपूर्वी कुंकवाचा वापर करत असत. पण कुंकवाचा वापर न करता टिकलीचा वापर सध्या महिलावर्ग मोठ्या प्रमाणात करताना पाहायला मिळतात. महिला चेहऱ्यावर लावण्यात आलेल्या टिकलीमुळे केवळ सुंदरच दिसत नाहीत तर त्याचे अनेक आरोग्यदायी फायदेही आहेत. टिकलीचा वापर सामान्यतः महिला ट्रेडिशनल लूकसाठी करतात. पण एका अभ्यासानुसार आरोग्यालाही टिकलीमुळे अनेक फायदे होतात. यामुळेच टिकलीचा वापर अनेक महिला करत आहेत. एवढेच नाही तर वेस्टर्न कपडे परिधान करणाऱ्या महिलाही आपल्या ड्रेसनुसार कलरफुल टिकली वापरण्यास सुरुवात करत आहेत. चेहऱ्यावरील टिकलीमुळे महिला खुपच सुंदर दिसतात आणि त्यामुळे अनेक आरोग्यदायी फायदेही होतात. कपाळावर टिकली लावण्याने अनेक फायदे होतात.**



**कपाळावर** टिकली लावल्यामुळे डोके दुखणे बंद होते. ॲक्युप्रेशर शास्त्रानुसार कपाळावर ज्या ठिकाणी टिकली लावण्यात येते, त्या जागेवर मसाज केल्यास डोकेदुखी तत्काळ बंद होते. टिकली लावलेल्या जागेवर मसाज केल्यास नाकाच्या आसपास ब्लड सर्क्युलेशन चांगल्या पद्धतीने होण्यास सुरुवात होते, ज्यामुळे तुम्हाला खूपच आराम मिळतो.

टिकली दोन्ही भुवयांच्या मध्यभागी ज्या ठिकाणी लावली जाते, शरीरातील सर्व नसा त्याच केंद्रावर एकत्र येतात. टिकली लावण्यात येणाऱ्या या जागेला अग्निचक्र या नावाने सुद्धा ओळखले जाते. म्हणूनच टिकली लावल्याने एकाग्रताही वाढते आणि मन शांत राहते. तसेच, टिकली लावल्याने ताणतणावही कमी होतो.

तुम्हाला पूर्ण झोप मिळत नाही आणि त्यामुळे तुम्ही त्रस्त आहात तर टिकली लावणे तुमच्यासाठी खूपच फायदेशीर होऊ शकते. टिकली शरीरच्या वरच्या भागाला शांत ठेवण्यासाठी खूपच फायदेशीर ठरते. कपाळावर टिकली लावल्याने चांगली झोप येते.

टिकली डोळ्यांच्या नसा मजबूत करण्यास खूपच मदत करते. टिकली कपाळ्याच्या मध्यभागी ज्या ठिकाणी लावली जाते, त्या ठिकाणच्या नसा आणि डोळ्यांमधील नसा यांच्यात एक कनेक्शन असते. टिकली डोळ्यांच्या नसांना मजबूत करण्यास मदत करते ज्यामुळे तुम्हाला एकदम स्पष्ट आणि साफ दिसण्यास मदत होते. एवढेच नाही तर टिकली लावल्याने आसपासचे मसल्स मजबूत आणि हेल्दी होतात.



तुमच्या चेहऱ्यावर जर सुरकुत्या पडण्यास सुरुवात होत आहे तर टिकली लावण्यास तुम्ही सुरुवात करा. कारण, टिकली लावल्याने चेहऱ्यावर येणाऱ्या सुरकुत्यांपासून सुटका मिळण्यास मदत होते.

# वजन घटवण्यासाठी ‘पीनट बटर’ उपयुक्त

**सँडविचमध्ये** लावण्यासाठी एक अतिशय पौष्टिक ‘स्प्रेड’ म्हणून ‘पीनट बटर’ म्हणजेच शेंगदाण्यांपासून तयार केले गेलेले बटर अतिशय लोकप्रिय होऊ लागले आहे. अतिशय पौष्टिक तत्त्वांनी परिपूर्ण असे पीनट बटर वजन घटवण्यासाठीही उपयुक्त असल्याचे आहारतज्ज्ञ म्हणतात. पीनट बटरमध्ये असणारी प्रथिने, जीवनसत्त्वे आणि क्षार वजन घटवण्यास सहाय्यक आहेत. पीनट बटरच्या सेवनाने भूक लवकर शमत असून, त्यामुळे अन्नाचे सेवन आपोआपच कमी होते. याच्या सेवनाने शरीराची चयापचय शक्ती वाढत असून, त्यामुळेही वजन घटण्यास मदत होते. पीनट बटर पोळीबरोबर, भाकरीबरोबर किंवा गव्हापासून तयार केलेल्या ब्रेडसोबत खाता येऊ शकते. फळे किंवा कच्च्या भाज्यांच्या कापांच्या सोबतही हे बटर खाता येते. सकाळच्या नाश्त्यामध्ये ओटमिल घेत असल्यास किंवा दह्यामध्ये मिसळूनही पीनट बटरचे सेवन करता येते. मात्र वजन घटवताना पीनट बटर आहारामध्ये समाविष्ट करताना त्यामध्ये इतर ‘ॲडीटिव्ह’ असणार नाहीत याची काळजी घेणे आवश्यक आहे. पीनट बटर बाजारातून आणण्यापेक्षा घरी तयार करणे अधिक चांगले. हे बटर बनवण्यासाठी शेंगदाणे भाजून घ्यावेत आणि त्यांची साले काढून घ्यावीत. त्यानंतर शेंगदाणे मिक्सरमध्ये घालून थोडेसे शेंगदाण्याचे तेल घालावे, त्यानंतर मिक्सर सुरू करून शेंगदाणे तीन ते चार मिनिटे मिक्सरवर वाटावेत. तयार झालेल्या शेंगदाण्याच्या पेस्टला पीनट बटर म्हटले जाते. यामध्ये चवीला थोडेसे मीठ घालावे. तसेच आवडत असल्यास किंचित मध आणि दालचिनीची पूडही यामध्ये घालता येऊ शकते.



# चेहरा उजळण्यासाठी कांदा आणि लसणाचा फेसपॅक

**सुंदर, नितळ, गोरी त्वचा कोणाला नको असते. यासाठी लोक चेहऱ्यावर विविध प्रयोग करत असतात. मात्र कांदा आणि लसूणचा फेसपॅक तुम्ही कधी ट्राय केलाय का?**





**त्वचा उजळण्यासाठी लसूण फायदेशीर :** लसूणमध्ये व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन बी६, सेलेनियम, झिंक असते. त्वचेवरील मुरुमे हटवण्यासाठी लसूण फायदेशीर आहे. लसणाच्या पेस्टमध्ये मध मिसळून हा पॅक लावल्यास चेहऱ्यास फायदा होता. पिंपल्सच्या जागी लसूणचा रस लावा, पिंपल्स लवकर बरे होतील आणि डाग राहणार नाहीत.

**त्वचेसाठी वरदान आहे कांदा :** कांद्यामध्ये अनेक व्हिटॅमिन असतात. याशिवाय अँटीऑक्सिडंट्सही असतात. कांद्याच्या रसात अँटी सेप्टिक, अँटी-बॅक्टेरियल यासारखे गुण असतात. ज्यामुळे त्वचेवरील मुरुमे निघून जातात.

**कसा करावा वापर :** तुम्ही रोजच्या डाएटमध्ये कच्च्या कांद्याचा वापर करू शकता. कांदा त्वचेसाठी चांगला. याशिवाय तुम्ही कांदा किसून त्याचा फेसपॅक बनवून वापरू शकता. तसेच कांद्याच्या रसाचाही वापर करू शकता.

# घरगुती लिपस्टिक तयार करणे इतके सोपे

**बाजारात** मिळणारे कॉस्मेटिक महाग तर असतातच पण आपल्या स्कीनवर विपरित परिणाम करणारे असतात. त्यातून ओठ हे तर सर्वात नाजूक असतात, यावर रोज बाजारातील लिपस्टिक लावली तर ओठ काळे पडू लागतात. म्हणून येथे आम्ही सोपी पद्धत सांगत आहोत ज्याने आपण घरी लिपस्टिक तयार करू शकता.



**साहित्य :** एक बीट, १/२ कोकोनट ऑइल, १/२ चमचा मधमाश्यांचे मेण, १/२ चमचा कोको बटर

**कृती :** बिटाचे पातळ काप करून वाळू द्या. डिहायड्रेटरमध्ये हे काप १२० डिग्रीवर ८ तास ठेवून वाळवू शकता. नंतर मिक्सरमधून वाटून पावडर तयार करा. मंद आचेवर एका भांड्यात अर्धा ते १ कप पाणी टाकून त्यात मेण, कोकोबटर, कोकोनट ऑइल आणि बीट पावडर मिसळा. चांगले ढवळा. गडद रंगासाठी अधिक पावडर किंवा वाळलेल्या चेरीज वापरू शकता. घट्ट झाल्यावर मऊ कपड्याने गाळून घ्या. लिप कंटेनरमध्ये हे मिश्रण ओतून घ्या. थंड होऊ द्या. आपले लिपस्टिक तयार झाले. हे पूर्णपणे नैसर्गिक असल्यामुळे ओठ काळे पडणार नाहीत.

# ‘ब्लॅक टी’चे असेही फायदे

**ब्लॅक** टीमुळे शरीरातील टॉक्सिंस, विषारी घटक बाहेर निघण्यास मदत होते. भारतात सर्वाधिक प्यायले जाणारे पेय म्हणून चहाचा पहिला क्रमांक लागतो. चहा, कॉफी म्हटले की अनेक जण दुधाचा चहा, कॉफीला पसंती देतात. दुधाच्या चहाच्या तुलनेत खूप कमी लोकांना ब्लॅक टी आवडते. तुलनेने ब्लॅक टी चवीला चांगली लागत नसली तरी तिचे अनेक फायदे आहेत. बाजारात अनेक प्रकारच्या ब्लॅक टी उपलब्ध आहेत. घरात बनवली जाणरी ब्लॅक टी लिंबू रस टाकून घेता येते. बाजारात इंग्लिश ब्रेकफास्ट टी, अर्ल ग्रे टी, आसाम टी, दार्जिलिंग टी, निलगिरी टी असे चहाचे अनेक प्रकार उपलब्ध आहेत.



काही दिवसांपूर्वी अमेरिकेतील कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटीत एक संशोधन करण्यात आले होते. या संशोधनाचा अहवाल युरोपियन जर्नल ऑफ न्यूट्रिशनमध्ये पब्लिश करण्यात आला होता. या अभ्यासानुसार ब्लॅक टीमध्ये विविध प्रकारचे विशेष तत्त्व असल्याचे सिद्ध झाले आहे. ब्लॅक टीमधील चहाचे विशेष तत्त्व पोटात जाऊन मोठा प्रभाव पाडतात. ब्लॅक टीमुळे वजन घटवण्यास मदत होते. तसंच शरीरातील टॉक्सिंस, विषारी घटक बाहेर निघण्यास मदत होते. विषारी द्रव्ये शरीरातून बाहेर निघाल्यामुळे कोणताही आजार बळावण्याची शक्यता कमी होते.

टॉक्सिंस शरीरातून बाहेर पडल्यामुळे आरोग्यही उत्तम राहण्यास मदत होते.

चहात अँण्टी ऑक्सिडेंट सर्वाधिक असतात. अनेक संशोधनांतून संशोधकांनी ब्लॅक टी आणि ग्रीन टीमध्ये प्रोबायोटिक्स तत्त्व आढळून येत असल्याचे सांगितले आहे. प्रोबायोटिक्स तत्त्व शरीरात प्रतिरोधक सूक्ष्मजीवांच्या वाढीसाठी मदत करतात.

ब्लॅक टी वजन नियंत्रणात ठेवून अनेक आजारांपासून बचावही करते.



ब्लॅक टीमध्ये दूध आणि साखर नसल्याने शरीरात फॅट जमा होत नाही. चहातील अँण्टीऑक्सिडेंट शरीरातील अतिरिक्त चरबी न वाढू देण्याचे काम करते. एका संशोधनातून दिवसांतून तीन वेळा ब्लॅक टी पिण्यामुळे रक्तदाब नियंत्रणात राहत असल्याचे समोर आले आहे. डोकेदुखी होत असल्यास ब्लॅक टीमध्ये लिंबू टाकून प्यायल्याने डोकेदुखीत आराम मिळतो.

# इंटरनेटवरील नको त्या गोष्टींपासून मुलांना असे ठेवा दूर

**आजच्या** डिजिटल जगात, इंटरनेटचा वापर थोरा-मोठ्यापासून ते लहान मुलापर्यंत प्रत्येक व्यक्ती करतो. लहान मुलांना इंटरनेटवर सहसा ऑनलाइन व्हिडीओ किंवा त्यांच्या वयोगटाशी संबंधित कार्टून इत्यादी यूट्यूबवर पाहायला आवडते. मात्र इंटरनेटवर अनेक प्रकारचे कंटेंट उपलब्ध असतात. ज्यामुळे मुले भरकटू शकतात. असे होऊ नये याकरिता मुलांच्या इंटरनेट ॲक्टिव्हिटीवर लक्ष ठेवणे आणि त्यासाठी सुरक्षित पद्धतींचा अवलंब करणे अत्यंत आवश्यक आहे. तुम्हालाही तुमच्या मुलांचा इंटरनेट वापर सुरक्षित ठेवायचा असेल तर, ही माहिती तुमच्यासाठी. यामध्ये आज आम्ही चुकीच्या कंटेंटपासून



मुलांचे संरक्षण करण्याच्या काही सोप्या टिप्स सांगणार आहोत. जाणून घेऊया.

**पॅरेंट्स कंट्रोल्स वापरा :**

आजकाल गुगलसह यूट्यूब आणि इंस्टाग्रामसारख्या अनेक प्लॅटफॉर्मवर पेरेंट्स कंट्रोल सुविधादेखील उपलब्ध आहे. तुमची मुले नियमितपणे वापरत असलेले ॲप्स नियंत्रित करण्यासाठी तुम्ही याचा वापर करू शकता.

**मुलांना इंटरनेट सुरक्षिततेबद्दल शिकवा**

हे सर्वात महत्त्वाचे काम आहे. कारण मुलांच्या ॲक्टिव्हिटीवर लक्ष ठेवणे सोपे काम नाही. अशात, मुलांना इंटरनेटवरील धोक्यांची माहिती देणे आणि त्यांना इंटरनेट वापरण्याच्या योग्य मार्गांची जाणीव करून देणे आवश्यक आहे. यासोबतच मुलांना ऑनलाइन पेमेंट आणि मालवेअरच्या धोक्यांबाबत आवश्यक माहिती दिली पाहिजे.

**स्वतंत्र ई-मेल आयडी तयार करा :**

तुम्ही मुलांसाठी वेगळा ई-मेल आयडी देखील तयार करू शकता, त्यामुळे वेब ब्राऊझिंग दरम्यान अनावश्यक जाहिराती टाळता येतील. यासोबतच तुमची मुलं कोणत्या प्रकारचा कंटेन्ट पाहत आहे याची अचूक माहितीही तुम्हाला मिळेल. त्याच वेळी, नवीन ई-मेल आयडीवरून ब्राऊझरच्या मदतीने तुम्ही असुरक्षित वेबसाइट आणि कुकीज बंद करू शकता.

# स्मरणशक्ती वाढवण्यासाठी ‘हाकिनी योगमुद्रा’ उपयुक्त

**नववर्षाचा** उल्लास आता सरला आहे आणि विद्यार्थी वर्गाला आता वेध लागले आहेत ते लवकरच येणार असलेल्या वार्षिक परीक्षांचे. सर्वसाधारणपणे मार्च ते एप्रिल महिन्यांच्या दरम्यान होणार असलेल्या या परीक्षांची तयारी, विद्यार्थी आतापासून करण्यास सुरुवात करीत असतात. पालकही या काळामध्ये मुलांच्या खाण्या-पिण्याची, त्याच्या तब्येतीची काळजी घेण्यामध्ये कोणतीही कसर बाकी ठेवत नाहीत. या काळामध्ये मुलांची स्मरणशक्ती चांगली राहावी याकरिता योग्य आहार, नियमित आणि पुरेशी झोप मुलांना मिळणे आवश्यक असते. यामुळे शारीरिक आणि मानसिक तणाव दूर होण्यास मदत होते. मुलांची स्मरणशक्ती चांगली राहावी, याकरिता योगसाधनेची मदतदेखील घेता येऊ शकेल. मेंदू सक्रिय राहून स्मरणशक्ती चांगली राहावी याकरिता योगसाधनेमध्ये हाकिनी मुद्रा सांगितली गेली आहे.



एखाद्या गोष्टीचा विसर पडत असल्यास ही मुद्रा लावून त्या वस्तूचे स्मरण करण्याचा प्रयत्न केल्याने ती गोष्ट आठवण्याची शक्यता मोठी असते. विद्यार्थ्यांच्याखेरीज ज्यांना वारंवार काही ना काही गोष्टी विसरण्याची सवय असते, त्यांच्यासाठी देखील ही मुद्रा लाभदायी आहे. ही मुद्रा करण्यासाठी दोन्ही हातांच्या पाचही बोटांचे अग्रभाग जुळवावे. त्यानंतर डोळे वरच्या बाजूला फिरवून त्यांवर अगदी हलका ताण द्यावा. श्वास घेत आपली जीभ हिरड्यांना टेकवावी. त्यानंतर श्वास सोडत जीभ पूर्वस्थितीत आणावी. ही मुद्रा करताना श्वासोच्छ्वास दीर्घ असावा. विद्यार्थ्यांकरिता स्मरणशक्ती वाढवण्याच्या दृष्टीने ही मुद्रा अतिशय लाभदायक आहे.

# महिलादिनापूर्वीच मुलींवर अत्याचार
## अल्पवयीन मुलीचा विनयभंग, तरुणीला लग्नाचे अमीष दाखवून फसवणूक



**ठाणे :** महिला दिनानिमित्ताने सर्वत्र विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जात असतानाच, भिवंडीत एका १० वर्षीय मुलीचा परिसरात राहणाऱ्या व्यक्तीने विनयभंग केला. तर दुसऱ्या एका प्रकरणात २४ वर्षीय महिलेला विवाहाचे अमीष दाखवून लैंगिक अत्याचार करण्यात आला. याप्रकरणी शांतीनगर आणि गणेशपुरी पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल आहेत.

यातील पहिली घटना शांतीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. पिडीत मुलगी १० वर्षीय असून तिच्या आई-वडिलांसोबत भिवंडीतील एका भागात राहते. त्याच परिसरात ४० वर्षीय व्यक्ती वास्तव्यास आहे. तिचे आई-वडिल ६ मार्चला रात्री १२ वाजता त्यांच्या नातेवाईकांना सोडण्यासाठी बाहेर गेले होते. यावेळी त्यांनी मुलीला ४० वर्षीय व्यक्तीकडे सोपविले होते. पिडीत मुलीचे पालक घरी आल्यानंतर तो व्यक्ती तेथून निघून गेला. परंतु मुलगी घाबरलेल्या अवस्थेत होती. त्यामुळे त्यांनी पिडीत मुलीला विचारले असता, तिने घडलेला प्रकार सांगितला. याप्रकरणी शांतीनगर पोलीस ठाण्यात पिडीत मुलीच्या आईने तक्रार दाखल केली. या तक्रारीच्या आधारे, शांतीनगर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ७४ सह बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ८ आणि १२ प्रमाणे गुन्हा दाखल आहे. त्याचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

तर दुसरे प्रकरण गणेशपुरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आहे. पिडीत २४ वर्षीय मुलीला तिच्या मित्राने विवाहाचे अमीष दाखवून तिच्यावर अनेकदा लैंगिक अत्याचार केले. याप्रकरणी भिवंडी शहर पोलीस ठाण्यात तिने तक्रार दाखल केली होती. हे प्रकरण ठाणे ग्रामीण पोलीस हद्दीतील गणेशपुरी भागात घडल्याने गणेशपुरी पोलीस ठाण्यात हे प्रकरण वर्ग करण्यात आले आहे.


# रस्ते जोडणी आणि खोदकामामुळे सर्वत्र धुळीचे वातावरण
# घोडबंदर मार्गावरील कामांमुळे धुळधाण

**ठाणे :** घोडबंदर मार्गावर मुख्य आणि सेवा रस्त्यांच्या जोडणीबरोबरच रस्त्याच्याकडेला मोठ्या गटाराच्या बांधणीची कामे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत सुरू असून त्यासाठी गेल्या काही महिन्यांपासून सेवा रस्त्यांवर अनेक ठिकाणी खोदाईची कामे सुरू आहेत. या कामादरम्यान उडणारी धुळ इतरत्र उडू नये यासाठी कामाच्या ठिकाणी पुरेशी काळजी घेण्यात येत नसल्याचे चित्र आहे. यामुळे खोदाई आणि रस्त्यावर इतरत्र पसरलेल्या माती धूळ इतरत्र उडत असल्याने नागरिक हैराण झाले असून या रस्त्याची अक्षरशः धुळधाण झाल्याचे दिसून येत आहे.

ठाणे शहरातील वाहतूकीसाठी मुंबई-नाशिक आणि घोडबंदर असे दोन मार्ग महत्वाचे मानले जातात. या मार्गांवर गेल्या काही वर्षांपासून मेट्रो मार्ग उभारणीचे काम सुरू आहे. याशिवाय, घोडबंदर येथील कासारवडवली चौकात उड्डाणपुल उभारणीचे काम सुरू आहे. या कामांमुळे दोन्ही मार्ग अरूंद झाल्याने येथे वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत असून यामुळे नागरिक हैराण झालेले आहेत. असे असतानाच त्यात आता घोडबंदर मार्गावरील कामादरम्यान होत असलेल्या धुळ प्रदुषणामुळे नागरिक अक्षरश मेटाकुटीला आले आहेत. घोडबंदर मार्गावरील वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी मुख्य आणि सेवा रस्त्यांच्या जोडणीची कामे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने हाती घेतली आहेत. या कामांचा एक भाग म्हणून मुख्य आणि सेवा रस्त्यांच्या मधोमध असलेली ही गटारे बुजवून त्याऐवजी रस्त्याच्या कडेला गटारे उभारणीची कामे सूरू आहेत.

माजिवाडा ते ओवळापर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजूला ही कामे सूरू आहेत. या कामांसाठी जागोजागी खोदाई करण्यात येत आहे. त्याजागी सिमेंट काँक्रीटची गटारे बांधण्यात येत आहे. या कामादरम्यान, कामाच्या ठिकाणी पुरेशी काळजी घेण्यात येत नसल्याने सर्वत्र धुळीचे चित्र आहे. या संदर्भात ठाणे महापालिकेच्या मुख्य प्रदुषण नियंत्रण अधिकारी मनिषा प्रधान यांच्याशी संपर्क साधला. मात्र, त्यांची प्रतिक्रिया मिळू शकली नाही. तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या माहिती व जनसंपर्क विभागाशी संपर्क साधूनही त्यांची प्रतिक्रिया मिळू शकली नाही.

रस्ते खोदताना किंवा रस्ता दुरुस्तीचे काम करताना वॉटर स्प्रिंकलर्स, रेन गन स्प्रिंकलरचा वापर करणे. ज्या रस्त्याचे काम चालू आहे, त्या रस्त्याच्या बाजूने मार्गरोधक बसविणे. बांधकाम साहित्याची वाहतूक करताना ट्रक ताडपत्रीने झाकलेले असावेत, असा नियम रस्ते कंत्राटदार, मेट्रोचे कामांसाठी नियमावलीत आहे. परंतु घोडबंदर सेवा रस्त्यांवर बांधण्यात येत असलेल्या गटारांवर अनेक ठिकाणी झाकणे दिसून येत नाहीत. यामुळे अपघात होण्याची भिती व्यक्त होत आहे.



### पालिकेचेही दुर्लक्ष

ठाणे महापालिका क्षेत्रातील वाढती बांधकामे आणि वाहन संख्येमुळे धुळ प्रदुषणात वाढ होत असून हे प्रदुषण रोखण्यासाठी पालिकेने काही वर्षांपुर्वी एक नियमावली तयार केली आहे. त्यानुसार पायाभूत सुविधांची विविध कामे करत असताना धुळ प्रदूषण नियंत्रणासाठी उपाययोजना केल्या नाहीतर पाच हजार ते २५ हजार रुपयांपर्यंत दंड आकारण्याची तरतूद आहे. या नियमावलीचे पालन करीत नसलेल्या बांधकाम व्यावसायिकांना पालिकेने काही दिवासंपुर्वी नोटीसा बजावून कामे थांबविण्याचे आदेश दिले होते. असे असले तरी घोडबंदर मार्गावरील मुख्य आणि सेवा रस्ते जोडणीच्या कामादरम्यान उडणारी धुळ इतरत्र उडू नये यासाठी कामाच्या ठिकाणी पुरेशी काळजी घेण्यात येत नसल्याचे चित्र आहे.

# जिल्ह्यात कातकरी कुटुंबांचे सर्व्हेक्षण युध्द पातळीवर सुरू...
# ठाणे जिल्ह्यात १२ हजार कातकरी कुटुंबियांना मिळणार पक्के घर

**ठाणे :** प्रधानमंत्री जनजाती गौरव दिनानिमित्त सुरू करण्यात आलेल्या प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महा अभियानाला ठाणे जिल्ह्यात गती मिळत आहे. या अभियानांतर्गत जिल्ह्यातील आदिम जमातीतील १३ हजार ३२ कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यात आले. त्यापैकी १२ हजार २३७ कुटुंबे घरकुलासाठी पात्र ठरली असून त्यातील सहा हजार लाभार्थींना पक्के घर बांधण्यासाठी मंजुरी मिळाली आहे. उर्वरित कुटूंबियांनाही लवकरच मंजुरी मिळणार आहे, त्यासाठी प्रक्रिया सुरु असल्याची माहिती जिल्हा परिषदे मार्फत देण्यात आली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जनजाती गौरव दिनानिमित्त प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महा अभियान सुरू केले आहे. देशातील ७५ विशेषतः असुरक्षित आदिवासी गटांचा विकास करणे हा या अभियानाचा उद्देश आहे. प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महा अभियान अंतर्गत आदिम जमातीतील पात्र कुटुंबांसाठी देशात ४.९० लाख लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे. या अभियानांतर्गत सुरुवातीला ठाणे जिल्ह्यात अंबरनाथ, भिंवडी आणि मुरबाड तालुक्यातील केवळ ३५ ग्रामपंचायतींचा समावेश करण्यात आला होता. परंतू मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी केलेला पाठपुरावा आणि जिल्ह्यातील आदिवासी संघटनांकडून वेळोवेळी केलेली मागणी यांच्या विशेष प्रयत्नांनी केंद्र शासनाकडील सर्वेक्षणाचे लिंक पुन्हा सुरू करुन देण्यात आली. कातकरी कुटुंब या लाभापासून वंचित राहू नये, त्याअनुषंगाने सद्यस्थितीत ठाणे ग्रामीण भागामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वेक्षणाचे कामकाज वेगाने सुरू आहे. या अभियाना अंतर्गत जिल्ह्यात वर्षे २०२४-२५ करिता आदिम जमातीतील १३ हजार ३२ कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यात आले होते. त्यातून, १२ हजार २३७ लाभार्थी पात्र झाले असून ९ हजार ६८७ लाभार्थ्यांची नोंदणी पुर्ण करण्यात आली आहे, तर ६ हजार ४६२ घरकुलांना मंजुरी देण्यात आलेली आहे. कोणतेही कुटुंब सर्वेक्षणापासून वंचित राहणार नाही याची विशेष दक्षता घेण्याबाबत सर्व तालुकास्तरीय यंत्रणेला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सुचना दिले आहेत. जिल्ह्यातील सर्वच तालुक्यामध्ये सर्वेक्षण युध्द पातळीवर सुरू असून सर्वेक्षण अंतिम टप्यात आहे.



### अनुदान कसे मिळणार?

मुलभूत सुविधांसह पक्के घर बांधण्यासाठी २ लाख रुपये अनुदान दिले जाणार आहे. तसेच स्वच्छ भारत मिशन अंतर्गत १२ हजार रुपये आणि मनरेगा अंतर्गत ९० दिवसांचे २७ हजार रुपये वेतन अशी तरतूद केलेली असून आदिम जमातीतील पात्र लाभार्थ्यांना जास्तीत जास्त लाभ देण्यासाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत विशेष प्रयत्न यावर्षी करण्यात आले आहे, अशी माहिती प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे यांनी दिली.

### तालुकानिहाय आकडेवारी

| तालुका | सर्वेक्षण कुटुंबे | पात्र लाभार्थी | मंजूर घरकुल |
|---|---|---|---|
| अंबरनाथ | ८६५ | ९४१ | ५५२ |
| भिवंडी | ४,१०१ | ३,९२१ | १,८२९ |
| मुरबाड | २,८९७ | २,५२२ | १,३४४ |
| शहापूर | ४,०७९ | ४५२ | २,४०५ |
| कल्याण | १,०१४ | ८७७ | ३३२ |

# बेकायदा जाहिरात फलक पालिका विकणार भंगारात
## भंगार विक्रितून पालिकेला मिळणार प्रति किलोमागे २६ रुपये



**ठाणे :** ठाणे महापालिका क्षेत्रातील बेकायदा तसेच धोकादायक जाहिरात फलक ठेकेदाराने स्वखर्चाने काढून भंगारात विकून त्या मोबदल्यात पालिकेला पैसे देण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. या निर्णयानुसार पालिकेने दोन वर्षांसाठी भंगार विक्रिचा ठेका देण्यासाठी दरपत्रके मागविली असून यानुसार पालिकेकडे प्राप्त झालेल्या चारपैकी एकाचा दर २६ रुपये ७० पैसे इतका आहे. हा दर तीन दरपत्रकांपेक्षा जास्त असल्याने त्यास पालिकेच्या प्रशासकीय सभेने मान्यता दिली आहे. यामुळे पालिकेला आता भंगार विक्रितून पालिकेला प्रति किलोमागे २६ रुपये ७० पैसे मिळणार असल्याचे स्पष्ट होत आहे.

घाटकोपरमधील जाहीराक फलक कोसळून झालेल्या दुर्घटनेनंतर ठाण्यातील बेकायदा जाहीरात फलकांचा मुद्दा ऐरणीवर आला होता. यावरून टिका होऊ लागताच ठाणे महापालिकेने बेकायदा जाहीरात फलकांविरोधात कारवाई सुरू केली होती. या कारवाईत शहरातील ४९ जाहिरात फलकांवर पालिकेने कारवाई केली होती. ४९ पैकी ५ जाहिरात फलक पुर्णपणे निष्कासित करण्यात आले होते, तर परवानगी पेक्षा जास्त आकाराच्या ४४ जाहिरात फलकांचा अतिरिक्त भागाचा फक्त पत्रा काढण्यात आला होता. याशिवाय, पाालिकेने जाहिरात फलकांचे लोखंडी सांगाडे धोकादायक आहेत की नाही, याची पाहाणी करण्यासाठी संबंधित कंपनी मालकांना फलकांचे स्थैर्यता प्रमाणपत्र सादर करण्याचे आदेश दिले होते. यानुसार २६० जाहिरात कंपन्यांनी जाहिरात फलकांचे स्थैर्यता प्रमाणपत्र पालिकेकडे सादर केले होते. या पाठोपाठ आता पालिकेने बेकायदा आणि धोकादायक फलकांचे लोखंडी सांगाडे नियुक्त ठेकेदाराने स्वखर्चाने काढून घेऊन भंगारात विकणे आणि त्या बदल्यात पालिकेला किलोमागे पैसे देणे, असा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. या संबंधीचा प्रस्ताव पालिकेने तयार केला होता. त्यास आयुक्तांनी मान्यता दिल्यानंतर तो प्रशासकीय सभेपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. त्यास प्रशासकीय सभेनेही मान्यता दिली आहे.

### काय आहे प्रस्ताव

ठाणे महापालिका क्षेत्रातील बेकायदा तसेच धोकादायक जाहिरात फलक स्वखर्चाने काढून घेणे आणि भंगारात विकून त्या मोबदल्यात पालिकेस प्रतिकिलो जास्तीत जास्त पैसे देणे या निकषावर आधारीत पालिकेने दोन वर्षांकरिता दर पत्रके मागविली होती. यामध्ये चारजणांनी दरपत्रके पालिकेकडे सादर केली होती. यानुसार नवी मुंबईतील मे. सादिक स्क्रॅप मर्चंट कंपनीने लोखंडी साहित्य प्रतिकिलो १५ रुपये तर, लाकडी साहित्यसाठी प्रति किलो २ रुपये असा दर दिला होता. ठाण्यातील मे. ब्राईट कन्स्ट्रक्शन ॲण्ड डेव्हलपर्स कंपनीने लोखंड प्रति किलो २३ रुपये ५ पैसे, मे. साईराज स्क्रॅप ट्रेडर्स कंपनीने लोखंड प्रति किलो २६ रुपये २५ पैसे तर, मे. मुस्ताक स्क्रॅप ट्रेडर्स कंपनीने लोखंड प्रति किलो २६ रुपये ७० पैसे असे दर पत्रक सादर केले होते. यापैकी मे. मुस्ताक स्क्रॅप ट्रेडर्स कंपनीचे दरपत्रक स्विकारण्यास पालिकेच्या प्रशासकीय सभेने मान्यता दिली असून यामुळे पालिकेला आता भंगार विक्रितून पालिकेला प्रति किलोमागे २६ रुपये ७० पैसे मिळणार असल्याचे स्पष्ट होत आहे.

# कल्याण डोंबिवली पालिकेच्या ६१ शाळा सीसीटीव्ही निगराणीत... ५०२ सीसीटीव्ही कार्यान्वित



**कल्याण :** कल्याण डोंबिवली पालिकेच्या ६१ शाळांमध्ये ५०२ सीसीटीव्ही बसविण्याचे काम पूर्ण झाले आहे. हे सीसीटीव्ही कार्यान्वित करण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा विचार करून हे सीसीटीव्ही बसविण्यात आले आहेत, अशी माहिती कल्याण डोंबिवली पालिकेच्या विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता प्रशांत भागवत यांनी दिली.

शाळांमधील वाढते गैरप्रकार विचारातून घेऊन शासनाने शासकीय, खासगी, महापालिका शाळांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याचे मागील वर्षी आदेश काढले होते. या आदेशाची तातडीने अंमलबजावणी करण्याचे आदेश आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता भागवत यांना दिले होते.

पालिका हद्दीतील ६१ शाळांची तातडीने पाहणी करून सीसीटीव्ही शाळांमध्ये बसविण्याचे नियोजन विद्युत विभागाने केले होते. दोन महिन्यापासून हे काम सुरू होते. हे काम आता पूर्ण झाले आहे. पालिका शाळांमधील सीसीटीव्ही कार्यान्वित झाले आहेत. या सीसीटीव्हीचे नियंत्रण शाळेच्या मुख्याध्यापकांच्या दालनात ठेवण्यात आले आहे. मुख्याध्यापकांनी आठवड्यातून किमान तीन वेळा सीसीटीव्ही चित्रण तपासण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

या सीसीटीव्ही चित्रणात काही आक्षेपार्ह बाब आढळून आली तर ती माहिती मुख्याध्यापकांनी आपल्या वरिष्ठांना द्यावी. या समन्वयातून स्थानिक पोलीस ठाण्याशी संपर्क साधण्याची जबाबदारी मुख्याध्यापकांकडे देण्यात आली आहे. सीसीटीव्हीमुळे शाळा, विद्यार्थी, शिक्षक यांच्यावर एका दालनातून नियंत्रण ठेवणे शाळा प्रमुखांना शक्य होणार आहे. अनेक वेळा शाळांना मे महिन्यात सुट्टी लागली की दिवसा, रात्रीच्या वेळेत शाळांमधील पंखे, खुर्च्या चोरट्यांकडून चोरीला नेण्याचे प्रकार वाढतात. सीसीटीव्हीमुळे हे प्रकार कमी होण्याची शक्यता शिक्षकांनी वर्तवली.

# भिवंडीत हॉटेलबाहेर फेकला जातो कचरा
## पालिका आयुक्तांनी घेतली हॉटेल मालक संघटनेबरोबर बैठक

**ठाणे :** भिवंडी शहरातील हॉटेल आणि बारमधील कचरा, शिल्लक राहीलेले अन्न याचा कचरा दैनंदिन स्वरुपात हॉटेलबाहेर फेकण्यात येत असल्याची बाब नवनियुक्त पालिका आयुक्त अनमोल सागर यांच्या निदर्शनास आली असून त्याची गंभीर दखल घेत त्यांनी मंगळवारी उपहारगृह मालकांच्या संघटनेबरोबर बैठक घेऊन कचऱ्याच्या डब्यांमध्येच कचरा टाकण्याची सुचना केली आहे. तसेच सर्व व्यावसायीक आस्थापनांसाठी घंटागाडीच्या वेळा आणि मार्ग निश्चीत करुन दिवसातुन दोन वेळा कचरा गोळा करावा अशा सुचनाही त्यांनी प्रशासनाला दिल्या आहेत.

भिवंडी महापालिका आयुक्त अनमोल सागर यांनी शहर स्वच्छतेवर भर देण्यास सुरूवात केली असून त्याचाच एक भाग म्हणून त्यांनी शहरातील सर्व हॉटेल,बार, परमीट रुम मालक आणि त्यांच्या संघटनांसोबत बैठक घेतली. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त देवीदास पवार, उपायुक्त (आरोग्य) शैलेश दोंदे, जनसंपर्क अधिकारी श्रीकांत परदेशी यांच्यासह पालिकेचे अधिकारी आणि हॉटेल, बार आणि परमीट मालक तसेच त्यांचे संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. हॉटेल मधील कचरा, शिल्लक राहीलेले किंवा वाया गेलेले अन्न याचा कचरा दैनंदिन स्वरुपात हॉटेल बाहेर फेकण्यात येत असल्याची बाब आयुक्त सागर यांच्या निदर्शनास आली होती. त्याची दखल घेऊन त्यावर उपाययोजना करण्यासाठी त्यांनी बैठक आयोजीत केली होती. शहर स्वच्छतेची जबाबदारी महापालिकेची आहेच. पण, त्याचबरोबर हॉटेल, बार, परमीट रुम मालक हे देखील शहराचे भागधारक आहेत. त्यामुळे त्यांच्या परिसराच्या स्वच्छतेची जबाबदारी ही त्यांची सुद्धा असणार आहे, असे त्यांनी बैठकीत सांगितले.

हॉटेल, बार, परमीट रुम चालक, मालक या सर्वांनी त्यांचे गाळ्याच्याबाहेर ओला कचरा आणि सुका कचरा यासाठी मोठे कचरा डबे ठेवावेत. तसेच त्यांच्या व्यवसायाच्या ठिकाणी निर्माण होणारा कचरा त्यांनीच वर्गवारी करुन त्या डब्यांमध्ये टाकावा, अशा सुचनाही त्यांनी केल्या. यापुढे सर्व आरोग्य निरीक्षकांनी दोन ते तीन वेळा अचानक भेटी देऊन कचरा वर्गीकरणासाठी डब्बे ठेवले आहेत की नाही, तसेच, कचऱ्याचे वर्गीकरण होत आहे किंवा नाही याची पहाणी करावी. तसेच सकाळी किंवा संध्याकाळी घंटा गाडीने कचरा गोळा केल्यावर पुनःश्च मधल्या कालावधीत जमा होणाऱ्या कचऱ्यासाठी पर्यायी व्यवस्था करावी, अशा सुचना त्यांनी प्रशासनाला केल्या.

दररोज घंटागाडी उपलब्ध झाली पाहीजे, अशी मागणी हॉटेल मालकांनी यावेळी केली. तसेच, स्वच्छतेबाबत हॉटेल मालक देखील आग्रही असतात. परंतु अनेकवेळा नागरीक देखील हुज्जत घालत असल्याने त्यांचा नाईलाज होतो, असेही हॉटेल मालकांनी सांगितले. त्यावर अशा वेळी त्या त्या क्षेत्रातील आरोग्य निरीक्षकला कळविण्यात यावे. महापालिकेकडून त्यांना सहकार्य केले जाईल, असे आयुक्त सागर यांनी सांगितले.



### नो वेस्ट झोन

यापुढे ज्या क्षेत्रात सलग हॉटेल, खानावळ, बार असतील, त्या क्षेत्राला नो वेस्ट झोन म्हणून घोषीत केले जाईल. त्या ठिकाणी हॉटेल संघटनेच्या सहकार्याने सुशोभीकरण करण्यात येईल. तसेच, यापुढे सर्व व्यावसायीक आस्थापनांसाठी घंटागाडीच्या वेळा आणि मार्ग निश्चीत करुन दिवसातुन दोन वेळा कचरा गोळा केला जाईल, असे आश्वासनही आयुक्तांनी दिले.

# बाल'छळ'गृह...!!! मुलीचा छळ झाल्याचा पालकांचा आरोप



**ठाणे :** विविध गैरप्रकरणातून सुटका करून आणलेल्या मुलांना उल्हासनगर येथील बाल निरीक्षण गृहात ठेवण्यात येते. मात्र या बाल निरीक्षण गृहाचा कारभार वादात सापडला आहे. बालविवाहातून सुटका करून निरीक्षण गृहात ठेवलेल्या एका अल्पवयीन मुलीने इतर अल्पवयीन मुलींकडून आपला छळ झाल्याचा आरोप केला आहे. तर तिची सुटका करण्यासाठी निरीक्षण गृहाच्या व्यवस्थापनाने पैशांची मागणी केल्याचा तिच्या पालकांनी आरोप केला आहे. याबाबत जिल्हा महिला व बालविकास अधिकाऱ्यांकडून चौकशी समिती नेमण्यात आली आहे. तर याच बाल निरीक्षण गृहातून मागील महिन्यात सात मुलींनी पळ काढल्याची घटना समोर आली होती. गेल्या दोन महिन्याच्या कालावधीत या घटनांमुळे या निरीक्षण गृहाचा कारभार वादात सापडला आहे.

बालविवाह, अवैध दत्तक प्रक्रिया, लैंगिक शोषण मारहाण यासारख्या विविध प्रकरणातून सुटका करून आणलेल्या बालकांची जिल्हा महिला व बाल विकास विभागाच्या अखत्यारीत येणाऱ्या उल्हासनगर येथील बाल निरीक्षणगृहात रवानगी करण्यात येते. याच पद्धतीने फेब्रुवारी महिन्याच्या अखेरीस उल्हासनगर येथील भाटिया हॉल येथे एका सोळा वर्षीय मुलीचा तिच्या पालकांनी बालविवाह लावून देण्याचा घाट घातला होता. जिल्हा बाल संरक्षण विभागाला याची माहिती प्राप्त होताच त्यांनी धडक कारवाई करून हा बालविवाह रोखला. नंतर मुलीला उल्हासनगर येथील बाल निरीक्षणगृहात ठेवले. मात्र या मुलीकडून आता आपला निरीक्षणगृहात इतर मुलींनी छळ केल्याचा आरोप केला जात असल्याची माहिती दिली आहे. तर याबत पालकांना विचारणा केली असता मुलीला सोडण्यासाठी निरीक्षण गृहाच्या व्यवस्थापनाने पैशांची मागणी केली असल्याची माहिती दिली.

२४ फेब्रुवारी रोजी विवाह रोखून संबंधित मुलीला उल्हासनगर येथील बाल निरीक्षण गृहात ठेवण्यात आले होते. यावेळी निरीक्षण गृह व्यवस्थापनाने आपल्याला लादी पुसणे, भांडी घासणे, झाडू मारणे यांसारखी कामे दिल्याचा आरोप मुलीने केला आहे. तसेच ही कामे न केल्यास निरीक्षणगृहातील इतर मुलींकडून आपल्याला धमकवल्याचा आरोपही मुलीने केला आहे. त्यामुळे मुलीला मानसिकरित्या धक्का पोहोचला असून तिच्यावर उल्हासनगर येथील मध्यवर्ती रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

### कारभारावर प्रश्नचिन्ह

याच निरीक्षण करतात सुमारे एक महिन्यापूर्वी निरीक्षणगृहाच्या संरक्षण भिंतीवरून उड्या मारून सात मुलींनी पलायन केल्याची घटना समोर आली होती. यातील सहा मुलींचा शोध घेण्यास पोलीस प्रशासनाला यश आले असून त्यांची पुन्हा निरीक्षण गृहात रवानगी करण्यात आली आहे. एक मुलगी अद्याप बेपत्ता असून तिचा पोलिसांमार्फत शोध सुरू आहे. तर पुन्हा निरीक्षण गृहात आलेल्या मुलींची चौकशी केली असता गृहातील व्यवस्थापनावर त्यांनी बोट ठेवल्याची माहिती सूत्रांनी दिली.

"संबंधित मुलीचा बालविवाह थांबवून तिच्या सुरक्षेच्या दृष्टीने तिला उल्हासनगर येथील बालनिरीक्षण गृहात ठेवले होते. मुलीने आणि तिच्या पालकांनी केलेल्या आरोपातील सतत्या तपासण्यासाठी चौकशी समिती नेमण्यात आली आहे. याचा अहवाल लवकरच येणार आहे."

**-संतोष भोसले, जिल्हा महिला बालविकास अधिकारी, ठाणे**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई 400063 (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १03, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००0१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com